cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२५९ | शनिवार, दि.११ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### इंडिया आघाडीत काँग्रेस एकाकी!

लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपाचा चौखूर उधळणारा वारू रोखण्यासाठी भाजपा विरोधकांनी एकत्र येत, गाजावाजा करत इंडिया आघाडीची स्थापना केली. अर्थात राजकीय स्वार्थांसाठी ही मंडळी एकत्र आली होती. या लोकांकडे कोणतेही वैचारिक अधिष्ठान नव्हते, समान कार्यक्रम नव्हते, विचारांमध्ये एकवाक्यता नव्हती, ध्येयधोरणे नव्हती. केवळ भाजपाविरोध या एकमेव धाग्यामध्ये लोकसभा निवडणुकीपुरती एकत्र आलेली ही मंडळी स्वार्थ संपताच निघून जाणार होती, हे निश्चित होते. कारण लोकसभा निवडणुकीत एकत्र येऊन अधिकाधिक जागा जिंकण्यासाठी ही मंडळी एकत्र आली होती.

# पीएम किसानसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे; १९ वा हप्ता मिळणार पण..!

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. जर तुम्ही पण लाभार्थी असाल तर अगोदर तुमचे नाव यादीत आहे की नाही ते तपासा, नाहीतर योजनेपासून वंचित राहाल. कारण १९ वा हप्ता देण्याअगोदर शासनाने काही मार्गदर्शक तत्त्वे जारी केले आहेत.**




केंद्र सरकार दरवर्षी ६ हजारांची आर्थिक मदत शेतकऱ्यांना देते. ही रक्कम पीएम किसान सन्मान निधी योजनेतंर्गत थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येते. शेतकऱ्यांच्या खात्यात दर चार महिन्याला ३ हप्त्यात दोन हजार रुपये जमा करण्यात येतात. सध्या या योजनेत एकूण १८ हप्ते जमा करण्यात आले आहे. तर आता शेतकऱ्यांना १९ व्या हप्त्याची प्रतिक्षा आहे. त्यातच सरकारने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहे. या नवीन गाईडलाईन्समुळे काही शेतकरी योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. जर तुम्ही अर्ज भरताना काही चूक केली असेल अथवा त्रुटी ठेवली असेल, चुकीचा बँक खाते क्रमांक ◀◀ पान २ वर

## काही शेतकरी वंचित राहण्याची शक्यता; अगोदर करा हे काम

### हे शेतकरी राहू शकतात वंचित

जर तुम्ही सरकारच्या गाईडलाईन्सचे योग्य पालन केले नाही तर १९ वा हप्ता खात्यात जमा होणार नाही. पीएम किसान योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांनी ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. नियमानुसार ई–केवायसी करणे अनिवार्य आहे. त्यासाठी पीएम किसान योजनेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करता येईल.

### या शेतकऱ्यांना बसणार फटका

जर तुम्ही अल्पभूधारक असाल तर त्याची पडताळणी प्रक्रिया पूर्ण करून घ्या. जिल्हा कृषी कार्यालयाकडून, भूमी अभिलेखाची पडताळणी करून घ्या. नाहीतर १९ व्या हप्त्यापासून तुम्ही वंचित राहाल.

### या क्रमांकावर करा कॉल

पीएक किसान टोल फ्री क्रमांक : १८००११५५२६६, पीएम किसान लँडलाईन क्रमांक : ०११–२३३८१०९२ , ०११–२३३८२४०१, पीएम किसान हेल्पलाईन : १५५२६१, १८००११५५२६६, पीएम किसान नवीन हेल्पलाईन क्रमांक : ०११–२४३००६०६

## मंत्री धनंजय मुंडेंनी घेतली छगन भुजबळांची भेट



**नाशिक । प्रतिनिधी**

मंत्री धनंजय मुंडे यांनी मुंबईतील या कॉलेजमध्ये छगन भुजबळ यांची भेट घेतली. तब्बल एक तास चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. बीड प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली असताना भुजबळ यांनी त्यांना साथ दिली होती. पुरावे नसताना धनंजय मुंडे यांनी राजीनामा का द्यावा असा सवाल भुजबळ यांनी उपस्थित केला होता. त्यानंतर शुक्रवारी झालेल्या या भेटीला महत्व प्राप्त झाले आहे.

### आव्हाड, रोहित पवार उतावीळ–मिटकरी

**पुणे । प्रतिनिधी**

शरद पवार गटात जयंत पाटलांच्या प्रदेशाध्यक्ष पदाला होणारा विरोध हा त्यांचा मराठा द्वेष दाखवतो का? असा सवाल करत आमदार अमोल मिटकरी यांनी जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार यांच्यावर टीका केली. हे दोघेही प्रदेशाध्यक्ष होण्यासाठी उतावीळ असल्याचे मिटकरी म्हणाले.

# सुरेश धस यांचाही आका?

## सुषमा अंधारे यांचा हल्लाबोल; इशारा नेमका कोणाकडे?




**मुंबई । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख प्रकरणावरुन शिवसेना ठाकरे गटाने हल्लाबोल केला आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी त्यांच्या अधिकृत ट्वीटरवरुन एक ट्वीट केले आहे. या ट्वीटमध्ये त्यांनी भाजपचे आमदार सुरेश धस यांच्यावर निशाणा साधला आहे. धस साहेब आपला लढा यशस्वी व्हावा हीच महाराष्ट्राची सदिच्छा आहे. पण महाराष्ट्राची इच्छा फलद्रूप करणे हे आपल्या आकांच्या हातात आहे..!, असे सुषमा अंधारेंनी म्हटले आहे. त्यामुळे धसांचा आका कोण? याविषयी सुध्दा जोरदार चर्चा सुरु झाली आहे.**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली. त्यांच्या हत्येला एक महिना उलटला आहे. तरी अद्याप या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक झालेली नाही. यामुळे सध्याचे राजकीय वातावरण तापले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ विरोधी पक्ष आणि विविध सामाजिक संघटनांनी आंदोलने सुरू केली आहेत. या हत्येप्रकरणामुळे धनंजय मुंडे वादाच्या भोवऱ्यात अडकले असून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी वारंवार केली जात आहे. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यानेच देशमुख यांच्या हत्येचा कट रचला, असा आरोप केला जात आहे. ◀◀ पान २ वर

### सुषमा अंधारेंचे ट्वीट

'सन्मा. धससाहेब, पिकविमा, मल्टीस्टेट बँकघोटाळे, खून अपहरण खंडणी यात गुन्हेगार, आका आणि आकांचे आका यांना शिक्षा होण्यासाठी आपण जंग जंग पछाडताय. आपला लढा यशस्वी व्हावा हीच महाराष्ट्राची सदिच्छा आहे. पण महाराष्ट्राची इच्छा फलद्रूप करणे हे आपल्या आकांच्या हातात आहे..!', असे सुषमा अंधारे म्हणाल्या. सन्मा. धससाहेब, पिकविमा, मल्टीस्टेट बँकघोटाळे, खून अपहरण खंडणी यात गुन्हेगार, आका आणि आकांचे आका यांना शिक्षा होण्यासाठी आपण जंग जंग पछाडताय. आपला लढा यशस्वी व्हावा हीच महाराष्ट्राची सदिच्छा आहे. पण महाराष्ट्राची इच्छा फलद्रूप करणे हे आपल्या आकांच्या हातात आहे..!

## मुन्नीमुळेच मी राष्ट्रवादी सोडली

### सुरेश धस यांचा गौप्यस्फोट; मुन्नीचे लय प्रेम पण ती बोलना

बीड–ती मुन्नी महिला भगिणी नाही, मुन्नीसोबत आमचे चार पाच फोटो असतील, मुन्नी बोलत नाही, मुन्नीच; कपडे टरा टरा फाडेल, मुन्नी मला घाबरत आहे, मुन्नीचे माझ्यावर फार प्रेम असल्याचे आ. सुरेश धस म्हणाले. तसेच मला राष्ट्रवादी सोडावी लागली, त्यातही याच मुन्नीचा हात असल्याचा गौप्यस्फोट धस यांनी केला. सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येला महिना उलटून गेला तरी सर्व आरोपी पोलिसांच्या ताब्यात आलेले नाही. दरम्यान, त्यातच आता संतोष देशमुखांच्या ◀◀ पान २ वर

### बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक कधी खुले होणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून दादरमधील महापौर निवासस्थानाच्या जागेत बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक उभारण्यात येत आहे. या वास्तूच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाला सुरुवात झाली. या स्मारकाच्या कामाची शिवसेना उबाठाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाहणी केली. बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक पुढील वर्षी २३ जानेवारी २०२६ ला जनतेसाठी खुले करण्याचा प्रयत्न असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

## देशमुख हत्येची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगही करणार चौकशी

### गुन्हा दाखल; खा. बजरंग सोनवणेंच्या पाठपुराव्याला यश

**बीड। प्रतिनिधी**

**मस्सोजागचे सरपंच संतोष देशमुख यांचा खून आणि त्यांच्या देहाची केलेली विटंबना माणूसकीला काळीमा फासणारी घटना असून या प्रकरणी खासदार बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय मानवाधिकारी आयोगाने स्वतंत्रपणे चौकशी करावी, अशी मागणी केली होती. या प्रकरणात आयोगाने गुन्हा दाखल करून घेतला असून आता आयोगही स्वतंत्र चौकशी करणार आहे.**



९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्याचे समजल्यानंतर सर्वात पहिल्यांदा संतोष देशमुख यांचा जीव वाचावा, यासाठी खासदार सोनवणे यांनी पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्याशी संपर्क केला. दरम्यान, त्यांनी फोन घेणे टाळले. शिवाय केज पोलीसांनी देखील हे प्रकरण गांभिर्याने घेतले नाही. या कालावधीत संतोष देशमुख यांचा मानसिक आणि शारीरिक छळ करुन हत्या झाली. संतोष देशमुख यांना इतक्या वाईट पध्दतीने मारहाण केली की शरीरावर एक इंच देखील जागा शिल्लक नव्हती. शिवाय शवाची विटंबना देखील करण्यात आली. इतक्या अमानुष पध्दतीने मारहाण झाल्याच्या घटनेने राज्यात खळबळ उडालेली आहे.

या प्रकरणी ३ जानेवारी रोजी बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, दिल्ली येथे आयुक्तांची भेट घेऊन मस्साजोग येथील घटनेबद्दल सविस्तर माहिती दिली. संतोष देशमुख कुटुंबियांना मदत मिळऊन देणे बाबत आयोगाला विनंती केली. सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या खुनाची ◀◀ पान २ वर

## मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली

### संभाजीनगरमधील रुग्णालयात उपचार



**संभाजीनगर । प्रतिनिधी**

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ जालन्यात सकल मराठा समाज आणि मराठा संघटनांकडून जनआक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला. या मोर्चामध्ये देशमुख कुटुंबीय, मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील, दीपक केदार यांच्यासह समाज बांधव सहभागी झाले होते. परंतु या मोर्चात मनोज जरांगे यांचे भाषण झाले नाही. मराठा आंदोलक मनोज ◀◀ पान २ वर

### जरांगेंचे मोर्चात भाषण नाही

प्रथमच आक्रोश मोर्चात मनोज जरांगे यांचे भाषण झाले नाही, कारण मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची तब्येत खराब आहे. त्यामुळे त्यांना छत्रपती संभाजी नगरच्या रुग्णालयात जायचे होते. त्यांनी आम्हाला तसे कळवलेले होते, अशी माहिती मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडूळ यांनी दिली. त्यामुळे जालना येथील मोर्चात जरांगे यांचे भाषण झाले नाही.

### धसांनी मोर्चाला जाणे टाळले

मनोज जरांगे हे मोर्चाला गेले पण त्यांनी भाषण केले नाही, संभाजीनगरला ते रुग्णालयात दाखल झाले. तर नेहमीच आक्रमक भाषा करणारे आ. सुरेश धस यांनी सुध्दा मोर्चाला जाणे टाळले असून तब्येत व बैठकीचे कारण त्यांनी पुढे केले आहे.

### धाराशिवमध्ये आज आक्रोश मोर्चा

धाराशिव–मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ मराठा क्रांती मोर्चा आणि सकल मराठा समाजाच्या वतीने दि. ११ जानेवारी रोजी धाराशिवमध्ये आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. बार्शी नाका ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात संभाजीराजे छत्रपती, मनोज जरांगे, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, मयत संतोष देशमुख यांचे कुटुंबीय सहभागी होणार आहेत.

### पप्पा, तुम्ही जिथे असाल तिथे हसत राहा–वैभवी

जालनामध्ये सभेत बोलताना दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख हिला अश्रू अनावर झाले. तुम्ही जिथे असाल तिथे हसत राहा असं भरल्या डोळ्यांनी वैभवी देशमुख वडिलांबाबत बोलली. यावेळ ती भावुक झाली. तिच्या या वाक्यानं उपस्थितही हेलावले. बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ जालन्यात मराठा क्रांती मोर्चा आणि सकल मराठा समाजाच्या वतीनं मोर्चा आणि सभा घेण्यात आली. यावेळी बोलताना वैभवी देशमुख भावुक झाली.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ०.५० क्विंटल | २,९४१ | २,९४१ | २,९४१ |
| ज्वारी/हायब्रिड :११.५० क्विंटल | २,०८४ | २,४५० | २,२९२ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १००.५० क्विंटल | ६,५०० | ७,३७१ | ७,१७२ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५७५ | ६,५३८ |
| बाजरी: २.०० क्विंटल | २,६८० | ३,१३० | २,९०५ |
| मुग : २.५० क्विंटल | ६,३०० | ७,२०० | ६,७५० |
| सोयाबीन: १२८.५० क्विंटल | ४,१०० | ४,१५० | ४,११५ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |

# शरद पवार काही दिवसाने सत्तेत सहभागी होणार?

## मंत्री संजय सिरसाट यांचा गौप्यस्फोट; महाराष्ट्राच्या राजकारणात महिन्याभरात मोठा भूकंप

**मुंबई । प्रतिनिधी**

**शिवसेनेच्या बड्या नेत्याने महाराष्ट्राच्या राजकारणाबाबत सर्वात मोठा दावा केला आहे. महायुती सरकारमध्ये महाविकास आघाडीमधील आणखी एक पक्ष सत्तेत सहभागी होणार असल्याचे भाकीत या नेत्याने वर्तवले आहे. त्यामुळे आगामी काळात काय–काय घडामोडी घडतात, ते पाहणे महत्त्वाचे आहे. मंत्री संजय सिरसाट यांनी शरद पवार हे सत्तेत सहभागी होतील, असे भाकित केले आहे. भाजपसोबत की अजितदादांसोबत जावून सत्तेत जाण्याविषयी शरद पवारांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये मतप्रवाह असल्याचेही ते म्हणाले.**




महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात सारं काही आलबेल आहे ना? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. कारण प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे राजीनामा देणार असल्याची चर्चा आहे. त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीत अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सत्तेत सहभागी होण्याचा मुद्दा मांडल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे याबाबत पक्षात दोन मतप्रवाह आहेत. एका गटाचे म्हणणे आहे की, थेट सत्तेत सहभागी व्हावे. तर दुसऱ्या गटाचे म्हणणे आहे की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षात पक्ष विलीन करुन ◀◀ पान २ वर

### आम्ही कोठेही जाणार नाही–आव्हाड

आमचा पक्ष हा मविआमध्येच कायम राहणार असून मी पक्षाचा राष्ट्रीय सरचिटणीस आहे. त्यामुळे मी सांगतो आम्ही सत्तेत जाणार नाही, असे जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.

### राजकारणात उद्या काय होईल ते सांगता येईल का?

#### उद्धव ठाकरे यांचे सूचक वक्तव्य; राजकीय वर्तुळात रंगू लागली चर्चा

मुंबई–राजकारणात कधी काय होईल? याचा भरोसा नाही. याची जाणीव आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना देखील आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत जे वक्तव्य केले त्याचा अर्थ काय काढायचा? अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. राजकारणात उद्या काय होईल ते सांगता येईल का? असे त्यांचे सुचक वक्तव्य आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचे कामकाज कुठपर्यंत झाले हे पाहण्यासाठी स्मारकस्थळी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते.

cmyk

## अग्रलेख

# इंडिया आघाडीत काँग्रेस एकाकी!

लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपाचा चौखूर उधळणारा वारू रोखण्यासाठी भाजपा विरोधकांनी एकत्र येत, गाजावाजा करत इंडिया आघाडीची स्थापना केली. अर्थात राजकीय स्वार्थांसाठी ही मंडळी एकत्र आली होती. या लोकांकडे कोणतेही वैचारिक अधिष्ठान नव्हते, समान कार्यक्रम नव्हते, विचारांमध्ये एकवाक्यता नव्हती, ध्येयधोरणे नव्हती. केवळ भाजपाविरोध या एकमेव धाग्यामध्ये लोकसभा निवडणुकीपुरती एकत्र आलेली ही मंडळी स्वार्थ संपताच निघून जाणार होती, हे निश्चित होते. कारण लोकसभा निवडणुकीत एकत्र येऊन अधिकाधिक जागा जिंकण्यासाठी ही मंडळी एकत्र आली होती. यामध्ये कोणी मित्र नव्हते अथवा कोणाची कोणाशी वैचारिक जवळीकही नव्हती. प्रत्येकजण एकेकाळी आपापल्या राज्यात मातब्बर होता. २०१४ नंतर केंद्रामध्ये तसेच विविध राज्यांमध्ये भाजपाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मुसंडी मारल्यावर त्या त्या राज्यातील प्रस्थापितांना जनाधार गमवावा लागला. राज्यातील सत्ता गेली, विरोधी पक्षांमध्ये बसण्याची वेळ आली.

२०१४ पाठोपाठ २०१९ साली झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये भाजपाला स्वबळावर सरकार स्थापन करता येईल, इतके स्पष्ट बहुमत मिळाले. काँग्रेसला तर विरोधी पक्षनेता मिळविण्याइतकेही संख्याबळ प्राप्त झाले नाही. २०१४ व त्यानंतर झालेल्या २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील इतिहास पाहता २०२४च्या लोकसभा निवडणुकीतही आपला पालापाचोळा उडणार असल्याची खात्री पटल्याने लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाविरोधातील मंडळी एकत्र आली व त्यातूनच इंडिया आघाडी देशाच्या राजकारणात जन्माला आली.

लोकसभा निवडणूक एकत्र लढणे व भाजपाला सत्ता मिळवू न देणे हा एककलमी कार्यक्रम राबविण्यासाठी इंडिया आघाडी कार्यरत झाली. मुळातच इंडिया आघाडीच्या वाटचालीला स्थापनेपूर्वीपासूनच ग्रहण लागले होते. ज्यांच्या संकल्पनेतून इंडिया आघाडी जन्माला आली, ते नितीशकुमारच लोकसभा निवडणुकीच्या अगोदरच काही महिने भाजपामध्ये सामील झाले. कर्णधारच मालिका सुरू होण्यापूर्वी प्रतिस्पर्धी संघाचा स्टार फलंदाज अथवा गोलंदाज बनावा, तशीच काही परिस्थिती नितीशकुमारांच्या भूमिकेमुळे इंडिया आघाडीची लोकसभा निवडणुकीअगोदर झाली. इंडिया आघाडीमध्ये भाजपाविरोधक एकत्र आले तरी पश्चिम बंगालची तृणमूल काँग्रेस, उत्तर प्रदेशातील सपा, दिल्ली-पंजाबमधील आम आदमी पार्टी, बिहारमधील लालू प्रसाद यादव यांचे राष्ट्रीय जनता दल यांचे काँग्रेसशी फारसे सख्य नव्हते. इंडिया आघाडीत हे सर्व घटक काँग्रेससोबत असले तरी काँग्रेसशी ते चार हात अंतर राखूनच होते, हे लोकसभा निवडणुकीदरम्यानच पाहावयास मिळाले होते.

लोकसभा निवडणुकीतील जागावाटपामध्ये उत्तर प्रदेशमध्ये सपापुढे, पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसपुढे, उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षापुढे, बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलापुढे, पंजाब आणि दिल्लीमध्ये आप पक्षापुढे काँग्रेसला दुय्यम भूमिका स्वीकारावी लागली. लोकसभा निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीला सत्ता मिळविता आली नसली तरी भाजपाला स्वबळावर सत्ता मिळणार नाही, इतपत यश इंडिया आघाडीला मिळाले होते. भाजपाला सत्ता मिळविण्यासाठी नितीशकुमारांचा संयुक्त जनता दल आणि चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसमच्या आधाराची गरज घ्यावी लागली. २०१९ ला विरोधी पक्षनेतेपदही मिळविण्यात अपयशी ठरलेल्या काँग्रेसला लोकसभेत शतकी मजल मारता आली. लोकसभा सभागृहात विरोधी पक्षाला अस्तित्व दाखविण्याइतपत सन्मानजनक संख्याबळ गाठता आले, हे इंडिया आघाडीचे यश होते. परंतु लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीचे तीनतेरा वाजण्यास सुरुवात झाली होती. त्या त्या राज्यांमध्ये मातब्बर असणाऱ्या इंडिया आघाडीला घटक पक्षांना विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसशी युती करण्यासाठी कोणतेही स्वारस्य नव्हते. किंबहुना त्यांना काँग्रेससोबत विधानसभा निवडणुका लढवायच्याच नव्हत्या. मुळात महाराष्ट्रात इंडिया आघाडीचे फारसे अस्तित्व नव्हतेच. इंडिया आघाडीतील काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस,उद्धव ठाकरेंची शिवसेना या तीन पक्षांची महाविकास आघाडी प्रभावी होती. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने भाजपा व मित्रपक्षांच्या महायुतीला महाराष्ट्रात रोखून धरले होते; परंतु लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या सहा महिन्यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा दणदणीत पराभव झाला. महायुतीने २८८ विधानसभा मतदारसंघांमधील २३० हून अधिक जागांवर विजयी मुसंडी मारली होती. महाविकास आघाडीला अवघ्या ४५ विधानसभा मतदारसंघांमध्ये विजय मिळाला होता. झारखंड व अन्य राज्यातही काँग्रेसच्या पदरी पराभवाची नामुष्की आली. काँग्रेसची त्या त्या राज्यांमध्ये होत असलेली पिछेहाट पाहिल्यावर इंडिया आघाडीमधील अन्य पक्षांनी काँग्रेसविरोधी सूर उघडपणे आळविण्यास सुरुवात केली. दिल्ली निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आप पक्षाने स्वबळावर निवडणूक लढविण्याची घोषणा करत काँग्रेसविरोधी बिगुल वाजविले. त्यापूर्वी काही दिवस अगोदरच इंडिया आघाडीचे नेतृत्व बदलण्याची भाषा करत काँग्रेसविरोधातील आपली भूमिका स्पष्ट केली होती. बिहारमध्ये लालूप्रसाद यादव यांचे पुत्र व बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनीही काँग्रेसविरोधी वक्तव्य करत केजरीवाल यांच्या भूमिकेचे समर्थन केले होते. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही केजरीवाल यांच्या भूमिकेचे समर्थन करताना दिल्लीच्या निवडणुकांमध्ये केजरीवाल यांना जाहीर पाठिंबा व्यक्त केला. महाराष्ट्रातही शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या देवेंद्र फडणवीसांशी झालेल्या गाठीभेटीमुळे भाजपा व त्यांच्यातील अंतर कमी होत असल्याचे चित्र महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झाले. इंडिया आघाडीचे खऱ्या अर्थाने तीनतेरा वाजण्यास आता मागील काही महिन्यांपासून सुरुवात झाली. इंडिया आघाडीतील अनेक पक्ष काँग्रेसविरोधी सूर आळवत इंडिया आघाडीतील काँग्रेसचे नेतृत्व अमान्य करू लागलेत. इंडिया आघाडीत काँग्रेस एकाकी पडू लागली. त्यामुळे येत्या काळात काँग्रेसविरहित इंडिया आघाडी अस्तित्वात राहिली तरी फारसे आश्चर्य वाटणार नाही.

# असे करा हरभऱ्यावरील घाटेअळीचे व्यवस्थापन



सद्यस्थितीत हरभरा हे पिक फुलोरा ते घाटे भरण्याच्या अवस्थेत असुन मागील काही दिवसातील ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावरील घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच अंधाऱ्या रात्रीत घाटेअळीचे पतंग मोठ्या प्रमाणावर अंडी देतात. या सर्व बाबी घाटेअळीस पोषक असल्यामुळे घाटेअळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. बऱ्याच ठिकाणी या अळीने प्रादुर्भाव करण्यास सुरुवात केली आहे. हि कीड बहुभक्षी असून विशेषतः पीक फुलोरा आणि प्रामुख्याने घाट अवस्थेत नुकसानकारक असते. लहान अळ्या सुरुवातीला कोवळी पाने, व फुले कुरतडुन खातात. घाटे लागल्यानंतर अळ्या घाटे कुरतडुन त्यास छिद्र पाडुन डोके आत खुपसुन आतील दाणे खातात. साधारणतः एक अळी तीस ते चाळीस घाट्यांचे नुकसान करु शकते. सध्या आढळणारी कीड ही अंडी अवस्था व प्रथम अवस्थेतील अळी अवस्था असल्यामुळे वेळीच उपाय योजना केल्यास कमी खर्चात किडींचे प्रभावी नियंत्रण होऊ शकते. या किडीचे खालीलप्रमाणे एकात्मिक व्यवस्थापन करावे.

एकात्मिक व्यवस्थापन

१. शेतामध्ये इंग्रजी " " आकाराचे प्रति एकरी २० पक्षी थांबे लावावेत., २. घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत. सापळ्यामध्ये सतत तीन दिवस ८ ते १० पतंग आढळल्यास किड व्यवस्थापनाचे उपाय योजावेत.,३. हरभरा पीक फुलोरा अवस्थेत असतांना ५% निंबोळी अर्काची किंवा ३०० पीपीएम अॅझाडीरेक्टीन ५० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी. अथवा वातावरणात सापेक्ष आर्द्रता पुरेशी असल्यास व्यूहेरीया बॅसीयांना या जैविक बुरशीनाशकाची ६० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे करावी. त्यामुळे घाटेअळीचे नियंत्रण होऊन तिच्या नैसर्गिक शत्रू कीटकांना अपाय न होता घाटेअळीचे नियंत्रण करण्यास मदत होईल. घाटेअळीने आर्थिक नुकसान संकेत पातळी गाठल्यास (सरासरी १ ते २ अळी प्रति मीटर ओळीत किंवा ५ टक्के घाट्यांचे नुकसान) शिफारशीत रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा; अन्यथा फवारणी टाळावी. वरील प्रादुर्भाव पातळी गाठल्यानंतर फवारणी केल्यास आपल्या उत्पादनामधील घट टाळून फवारणीचा खर्च भरून निघेल; अन्यथा फवारणीचा खर्च वाया जाऊ शकतो. याची शेतक-यांनी कृपया नोंद घ्यावी. किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर खालील कोणत्याही एका कीटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून साध्या (नॅपसॅक) पंपाने फवारणी करावी. पावर पंपाने फवारणी करायची असल्यास कीटकनाशकांचे प्रमाण तिप्पट करावे. आवश्यकता भासल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी.

कीटकनाशके

मात्रा / १० लि. पाणी

१) क्लोरपायरिफॉस २० ईसी : २० मिली ; किंवा, २) किनालफॉस २५ ईसी : २० मिली ; किंवा,. ३) इमामेक्टीन बेंझोएट ५ एसजी : ४ ग्रॅम ; किंवा, ४) क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ एससी : २.५ मिली ; किंवा, ५) 'लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ ईसी : १२ मिली ; किंवा, ६) नोव्हाल्युरॉन १० ईसी : १५ मिली शेतात किटकनाशकाची फवारणी करतांना हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा व सुरक्षिततेची योग्य ती काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड श्री. सुभाष साळवे यांचे मार्फत करण्यात येत आहे.

**दिनकर जाधव, सारणी**

# ऐतिहासिक रणखांब वादाच्या भोवऱ्यात

## सामाजिक कार्यकर्त्यांना अरेरावी करणाऱ्या पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा जिल्हाधिकाऱ्यांना तक्रार -डॉ.ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

आदिलशाही -निजामशाही काळातील महाराष्ट्रात दिशादर्शक व अंतर दाखवणारे दगडी स्तंभापैकी बीड शहरातील नगर रोडवरील चंपावती शाळेच्या समोरील फुटपाथवर असणारा "रणखांब शिलालेख" ईतरत्र हलविण्यात आला असुन दुरूस्तीच्या नावाखाली पुरातत्व विभाग आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने साडे ५ लाख रुपये घशात घालण्यासाठी केलेली उठाठेव असुन संबंधित दुरूस्तीच्या कामाची चौकशी करण्यात यावी.तोपर्यंत देयके अदा करण्यात येऊ नयेत अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, शेख युनुस च-हाटकर आणि रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे, सय्यद सादेक यांनी शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाला केली असुन आंदोलनाचा ईशारा दिला आहे. शिलालेखाचे पी आर कार्ड आणि वसलेवार टीपन पाहता या वास्तुची एकुण जागा १४.३० चौरस मीटर आहे.म्हणजे फुटात धरली तर पुर्व पश्चिम १४.३० फुट एवढी आणि दक्षिण उत्तर १२.३० फुट एवढ्या क्षेत्रावर हि ऐतिहासिक शिलालेख वास्तु उभारणे आवश्यक असताना ५ बाय ५ फुट जागेत स्थलांतरीत करण्यात आले आहे.ऐतिहासिक वास्तु पुरातत्व खात्यांतर्गत येत असुन ऐतिहासिक वास्तूंची मालकी पुरातत्व खात्याच्या नावाने महसूल दरबारी नोंद आवश्यक असताना या ऐतिहासिक वास्तूंची नोंद कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या नावाने नोंद असल्याने याची सखोल चौकशी करण्यात यावी. दि.६ सोमवार रोजी ऐतिहासिक रणखांब शिलालेखाचे स्थलांतर करत असताना कायदेशीर प्रक्रिया राबवुन स्थलांतर करण्याची मागणी करणा-या रामनाथ खोड, अशोक येडे, सय्यद सादेक यांना पुरातत्व खात्याच्या अधिकाऱ्यांनी तुमचा संबंध काय?? तुम्ही विचारणारे कोण?? म्हणत शिवाजीनगरचे पोलिस यांना पाचारण करून दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. ऐतिहासिक वारसा जपण्याची जबाबदारी असणाऱ्या पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी ऐतिहासिक वारसा जपणा-या सामाजिक कार्यकर्त्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न निषेधार्थ असुन संबंधित प्रकरणात चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस यांनी केली आहे.




# ना.पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत परळीत भाजप सदस्यता महा अभियानाची बैठक

## प्रत्येक बुथ प्रमुखांनी अधिकाधिक सदस्य करण्यासाठी जोमाने काम करण्याचे केले आवाहन



**परळी वै । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टी जगात क्रमांक एकचा पक्ष आहे. या पक्षाची विचारधारा समाजातील सर्व सामान्य लोकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी संघटन पर्व अंतर्गत जास्तीत जास्त सदस्य आपल्याला करायचे आहेत, त्यासाठी प्रत्येक बुथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी जोमाने काम करावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.**

भाजपच्या सदस्यता महाअभियान अंतर्गत आज परळी मतदारसंघातील शक्ती केंद्रप्रमुख आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक अक्षता मंगल कार्यालयात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.भारतीय जनता पक्ष हा जगातील सर्वात शक्तिशाली व मजबूत संघटन असलेला राजकीय पक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपण देशभर चांगले काम करत आहोत. सर्व सामान्य जनतेचे हित लक्षात घेऊन योजना अंमलात आणत आहोत. आगामी काळात पक्षाचा विस्तार अजून वाढविण्यासाठी सर्वांना अधिक जोमाने काम करायचे आहे. समाजाच्या सर्व स्तरातील घटकांतील लोक पक्षात आले पाहिजेत यासाठी सदस्यता महा अभियान सध्या देशभर राबविण्यात येत आहे, याचाच एक भाग म्हणून बुथ स्तरावरील प्रत्येक कार्यकर्त्यांनी किमान दोनशे नवीन सदस्य करावेत असे आवाहन ना. पंकजाताईंनी केले. मी आता राज्यात मंत्री आहे, हे पद माझ्यासाठी फक्त जनतेच्या सेवेसाठी आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्या बरोबरच संघटनात्मक बांधणी देखील तितकीच महत्वाची आहे असंही त्या म्हणाल्या.

### स्व. संतोष देशमुख यांना बैठकीत श्रध्दांजली

बैठकीच्या सुरवातीला मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांना भाजपच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. बैठकीचे संचलन शिवाजीराव गुट्टे यांनी केले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, अभियानाचे प्रभारी नवनाथ शिराळे, तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, जीवराज ढाकणे, श्रीहरी मुंडे, शाम आपेट, जीवनराव किर्दंत, दत्ता जाधव, अविनाश मोरे, वैजनाथ जगतकर, गणेश कराड आदी उपस्थित होते.

# पी.एम. किसान आणि निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान आठवडाभरात मिळणार

## आ.विजयसिंह पंडित यांनी आयोजित केलेल्या बैठकीत निर्णय




**बीड । प्रतिनिधी**

**संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने पात्र केलेल्या १२ हजार लाभार्थ्यांना मंजुरी आदेश देवून नियमित अनुदान सुरु करावे, कृषी आणि महसुल विभागाच्या अधिकार्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे प्रलंबित राहिलेल्या पी.एम.किसान योजनेतील ३ हजार पात्र लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान सुरु करण्यासह ग्रामपंचायत विभक्तीकरण, प्रलंबित मावेजा प्रकरणे यांसह विविध विषयासंदर्भात आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने संबंधित अधिकार्यांना सूचना देवून पात्र लाभार्थ्यांना आठवडाभरात अनुदान मिळेल असे आश्वासन दिले. विविध विषयात येणार्या अडचणीच्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर मार्ग काढण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. बैठकीला जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.**

गेवराई विधानसभा मतदार संघातील विविध विषयांच्या अनुषंगाने आ.विजयसिंह पंडित यांनी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेतली. संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने गेवराई तालुक्यातील सुमारे १२ हजार पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजुर केले आहेत. मात्र तहसिल कार्यालयातील दफ्तर दिरंगाईमुळे पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशाचे वाटप न केल्यामुळे मागील चार महिण्यांपासुन निराधार लाभार्थी अनुदानापासुन वंचित होते. कृषी आणि महसुल अधिकार्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे शुल्लक त्रुटी काढुन तालुक्यातील तीन हजार लाभार्थी पी.एम. किसान योजनेच्या रास्त लाभापासुन वंचित आहेत. या दोन्ही प्रश्नांबाबत आ. विजयसिंह पंडित यांनी बैठकीत विचारणा केली. त्याच बरोबर या बैठकीत ग्रामपंचायत विभक्तीकरण करुन बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देणे, प्रलंबित भुसंपादनाची प्रकरणे, श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील तिर्थक्षेत्र विकास आराखडा यासह विविध विषयांवर या बैठकीत चर्चा होवुन अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले. प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना (पी.एम. किसान) मधील अपात्र झालेल्या सुमारे तीन हजार लाभार्थी शेतकर्यांना आवश्यक असलेले महसुली पुरावे उपलब्ध करुन देण्याच्या सुचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी तहसिलदारांना दिल्या. कृषी विभागाचे उपसंचालक आणि जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा तात्काळ करुन कृषी आयुक्त कार्यालयाला सादर करणार आहेत. सुमारे २१०० लाभार्थ्यांना पुढील आढवडेभरात अनुदान सुरु करणार असल्याचे या बैठकीत नियोजन करण्यात आले. संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेश देण्यासाठी लागणार्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या याद्या उपलब्ध करुन देण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले. त्यामुळे पुढील पाच दिवसात योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशाचे वाटप करुन अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरु करणार असल्याचे तहसिलदार खोमणे यांनी सांगितले. त्यामुळे गेवराई तालुक्यातील गोर-गरीब लाभार्थ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात आ. विजयसिंह पंडित यांना यश आले आहे. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेश सुर्यवंशी, जिल्हा परिषदेचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर मोकाटे, तहसिलदार संदिप खोमणे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, कृषी उपसंचालक जाधवर, तंत्र अधिकारी खेडकर, तालुका कृषी अधिकारी अभयकुमार वडकुते यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पान १ वरून...

### पीएम किसानसाठी नवीन मार्गदर्शक

टाकला असेल तर तुमचा हप्ता थांबवल्या जाईल. बँक खात्याशी आधार कार्ड लिंक नसेल तर तुमचा हप्ता अटकू शकतो. या चुकांमुळे तुमचा हप्ता जमा होणार नाही. त्यासाठी पीएम किसान योजनेच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा नजकीच्या ऑनलाईन सेवा केंद्रात माहिती अद्ययावत करा.

---------

### सुरेश धस यांचाही

वाल्मिक कराड यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून त्यांची चौकशी सुरु आहे. सुषमा अंधारे यांच्या या पोस्टनंतर आता अनेकजण आका आणि आकांचे आका कोण, असा प्रश्न विचारत आहेत. तसेच त्यांच्या पोस्टनंतर सुरेश धस यांचे आका कोण?, असाही प्रश्न उपस्थितीत होत आहे. मात्र अद्याप यावर कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

------------

### मुन्नीमुळेच मी

मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी, याकरता ठिकठिकाणी जनआक्रोश मोर्चा काढण्यात येत आहे. या मोर्चात सुरेश धस देखील सहभागी होताना दिसत आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून सुरेश धस हे सातत्याने मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करत असताना आका या शब्दाचा उल्लेख करताना दिसत आहेत. मात्र दोन दिवसापुर्वी त्यांच्याकडून मुन्नी या शब्दाचा उच्चार करण्यात आल्याचे पाहायला मिळाले. यानंतर मुन्नी नेमकी कोण? याच्या चर्चा सुरू झाल्या. त्यावर बोलताना सुरेश धस म्हणाले, ती मुन्नी आहे, तिला कळले आहे, ती महिला भगिणी नाही. ती मुन्नी राष्ट्रवादी मधलीच आहे. मुन्नीसोबत आमचे चार पाच वेळा फोटो असतील. मुन्नी बोलत नाही, मुन्नीचे कपडे टरा टरा फाडेल. मुन्नी मला घाबरत आहे. मुन्नीचे माझ्यावर फार प्रेम आहे. आपण मुन्नीची वाट पाहूयात, असे सुरेश धस म्हणाले. तसेच मला त्यावेळी राष्ट्रवादी सोडावी लागली होती, त्यातही याच मुन्नीचा हात असल्याचा गौप्यस्फोट आ. धस यांनी केला. त्यामुळे धस यांचा इशारा धनंजय मुंडे यांच्याकडे आहे का? असा सवालही उपस्थित होत आहे.

---------------

### मनोज जरांगे पाटील

जरांगे पाटील यांची तब्येत खराब आहे. त्यामुळे त्यांनी मोर्चाच्या आयोजकाना मी बोलणार नाही. माझी तब्येत खालावली आहे, असे सांगितले होते. त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांना उपचारासाठी संभाजीनगरच्या गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. यावेळी गॅलेक्सी हॉस्पिटलचे डॉक्टर प्रदीप चावरे यांनी जरांगे पाटील रक्तदाब कमी आहे. बॅक पेन जास्त आहे त्यामुळे त्यांचे सिटी स्कॅन करण्यात येणार आहे. आता रिपोर्ट आल्यावर त्यांच्यावर पुढील रिपोर्ट आल्यावर उपचार केले जाणार आहेत.

----------

### देशमुख हत्येची राष्ट्रीय मानवाधिकार

घटना अत्यंत अमानवी आहे. यात मानव अधिकाराचे उल्लंघन झाले असल्यामुळे या प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दखल घ्यावी, अशी आग्रहाची विनंती केली होती. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने खासदारांची विनंती मान्य करून मस्साजोग प्रकरणात गुन्हा क्र.३३/१३/५/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करून घेतला आहे. आता या गुन्ह्यामधील तपास, पोलिस आणि न्यायव्यवस्था यावर राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांचे सुद्धा लक्ष असेल. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग जिल्ह्यामध्ये तातडीने टीम पाठवून कारवाई करणार आहे. शिवाय या संपूर्ण घटनेचा अहवाल मागवणार असून ही टीम दिल्ली येथील असेल. घटनेच्या वेळी अथवा तपासामधे पोलिसांचे दुर्लक्ष झाले असल्यास राष्ट्रीय मानवाधिकार आयोग तसा अहवाल देते व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाला याबाबत कारवाई करण्याचे अधिकार आहेत. आयोगाला न्यायिक व अर्धन्यायिक अधिकार आहेत.

------------

### शरद पवार काही दिवसाने

सत्तेत सहभागी व्हावे, अशी माहिती सूत्रांनी दिली. या बातम्या ताज्या असतानाच आता शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात पुढच्या महिन्याभरात मोठा भूकंप होणार असल्याचा खळबळजनक दावा केला आहे. शिवसेनेचे नेते तथा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी मोठे भाकीत वर्तवले आहे. शरद पवार गट लवकरच सत्तेत सहभागी होईल, असा मोठा दावा संजय शिरसाट यांनी केला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात येत्या महिन्याभरात भूकंप होईल, असे संजय शिरसाट म्हणाले आहेत. शरद पवार गट महाविकास आघाडीत राहणार नाही, असेही संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. ११ जानेवारी २०२५



## मंठामध्ये भरदिवसा शिक्षकाच्या घरी साडेतीन लाखाची चोरी



मंठा (प्रतिनिधी )मंठा येथील मंठा जालना रोडवरील नूतन कॉलनी येथे वास्तव्यास असणारे श्री सोपान पांडुरंग वाघमारे -शिक्षक (स्वामी विवेकानंद विद्यालय ) यांच्या घरी भर दिवसा हॉलच्या दरवाजाचे लॉक तोडून दिवसाढवळ्या चोरी करण्यात आली यामध्ये चोरट्यांनी साडेतीन तोळे सोन्याचे गंठण, पाच ग्रॅमची सोन्याची अंगठी , वीस तोळ्याचे चांदीचे जोडवे आणि चैन आणि काही रोख रक्कम असे एकूण तीन लाख साठ हजार एवढा ऐवज दिवसाढवळ्या हॉलचा लॉक तोडून लंपास केला आहे या प्रकरणात त्यांनी आज्ञात चोरटेविरुद्ध मंठा पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील ३ जानेवारी रोजी शुक्रवारी दुपारी बारा ते दोनच्या दरम्यान घडली. त्यावेळी या शिक्षकाचे सर्व कुटुंब बाहेर असताना मुख्य हॉलच्या दरवाजाची लोक तोडून सर्व ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे. याप्रकरणी मंठा शहरात भर दिवसा चोरी झाल्यामुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरला आहे. पोलिसांनी लवकरात लवकर तपास करावे अशी मागणी शिक्षकाकडून करण्यात येत आहे

# मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यक्रमात बडेंचे बडे मुद्दे





## दर्पण दिन उत्साहात साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

**दर्पण दिनाच्या निमित्ताने वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेने आयोजित केलेल्या शाळकरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करताना अध्यक्षीय भाषणातून भाजप नेते सोमनाथराव बडे यांनी बीड जिल्हा हा गुणवत्तेचा नवा पॅटर्न होऊ शकतो असे सांगत महत्त्वपूर्ण बडे मुद्दे मांडले.**

याबाबत अधिक वृत्त असे की,वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेत यंदाच्या दर्पण दिनानिमित्त वडवणी तालुक्यातील पिंपळटक्का येथील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना दर्पण दिनानिमित्त शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे जेष्ठ नेते सोमनाथराव बडे तर प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी बी.वाय. उजगरे, भाजपचे माजी नगरसेवक आत्माराम जमाले पाटील,डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे,सरपंच संतोष कदम,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राधाकिशन कदम,मुख्याध्यापक बंडु मुंडे, ज्येष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे, तालुका अध्यक्ष सतिश सोनवणे, सचिव महेश सदरे, उपाध्यक्ष धम्मपाल डावरे,कोषाध्यक्ष वाजेद पठाण,पत्रकार ओमप्रकाश साबळे,पत्रकार हरी पवार, पत्रकार अतुल जाधव,पत्रकार गीतांजली लव्हाळे,पत्रकार संभाजी लांडे,पत्रकार विजय राऊत, पत्रकार हर्षद उंडाळकर, माजी मुख्याध्यापक शेख सैलानी,पत्रकार ज्ञानेश्वर वाव्हळ, उपाध्यक्ष हनुमंतराव कदम, समितीचे सक्रिय सदस्य इंद्रमोहन कदम यांच्यासह आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. तर कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या प्रमुख अतिथींचे स्वागत सत्कार शाळा व ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आला. प्रमुख मान्यवर व मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना भाजप नेते प्राचार्य सोमनाथराव बडे म्हणाले की पुणे, मुंबई, लातूर पॅटर्न लयभारी म्हणून चर्चा केली जाते. खरी गुणवत्ता आपल्या जिल्ह्यात आहे. याचं उदाहरण एमपीएससी परिक्षेत देशात पहिला आलेल्या जोगदंड या विद्यार्थ्याने सिद्ध करून दाखवले आहे. खरच आगामी काळात बीड जिल्हा हा गुणवत्तेचा नवा पॅटर्न होऊ शकतो या खेड्यापाड्यातूनच उद्याचे भावी अधिकारी तयार होऊ शकतात असे बडे मुद्दे भाजप नेते सोमनाथराव बडे यांनी मांडले. तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बी.वाय. उजगरे बोलताना म्हणाले की,आपल्या बीड जिल्ह्याला ऊसतोड कामगारांना जिल्हा म्हणून लागलेला कलंक पुसून टाकायचा आहे. त्यासाठी कोयत्याऐवजी लेखनी हातात घेणं अत्यावश्यक असल्याचं सांगत मराठी पत्रकार परिषदेच्या या कार्याचे कौतुक केले. डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिलराव वाघमारे यांनी सामाजिक दायित्वातून उतराई होण्यासाठी आमच्या मराठी पत्रकार परिषदेच्या सर्व पत्रकार बांधवांचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे सांगितले तर सरपंच संतोष कदम यांनी शाळेला पायाभूत सुविधा पुरवताना कुठलीही कसर ठेवणार नाही. यापुढेही शाळेला भरीव स्वरूपाचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. शालेय साहित्याचे वाटप झाल्यानंतर अल्पोपहार घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या बहारदार कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन ज्ञानेश्वर राऊत सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बंडू मुंडे सर,मस्के मॅडम,जगताप मॅडम,तांबडे मॅडम,डोंगरे सर,कदम सर,पाटील सर,आणि मुंडे सर यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

## जिल्हा पुरवठा विभागाच्या

करण्यास दिरंगाई होत असल्याची आमची माहिती आहे.या बाबत प्रशासकिय कारवाई व्हावी, माथाडी नियामानूसार दरमहा वेतन जमा न करणाऱ्याकडून १०% दंडाची वसूल करण्यात यावी,बीड शहर गोदामातील हमालांना बेकायदेशीर रित्या कामावरुन कमी केल्याने त्यांना तात्काळ कामावर घेण्या यावे व माथाडी मंडळाने नियूक्त न केलेल्या कामगाराकडून काम करुन घेतल्याने संबंधीत नियूक्त कामगारांचे अर्थिक गळचेपी होत असल्याने त्यांना त्वरीत कामावर घेण्याच्या सूचना द्याव्यात अशी विनंती असे न झाल्यास माथाडी कायद्यातील तरतूदीनूसार कार्यवाही व्हावी,मा. उच्च न्यायालयाने १ ऑगष्ट २०२३ रोजी माहे मार्च २०१२ पासूनचा महागाई निर्देशांकाचा फरक देण्याबाबत आदेश दिला मात्र पुरवठा विभागास वेळोवेळी अवगत करुनही फरक मिळाला नाही तात्काळ फरक देण्यात यावा,थेट वाहतूक टप्पा १ व टप्पा २ साठी गोदामातील नियूक्त हमालांचा रोजगार कमी होत असल्याने संबंधीत कंत्राटदाराने ज्या त्या गोदामातील नोंदीत हमालांकडूनच काम करुन घ्यावे. यावेळी हमाल माथाडी कामगार संघटनेचे अध्यक्ष राजकुमार घायाळ यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव येथील दत्तात्रय तौर,दशरथ शिंदे,ज्योतीराम खामकर,लक्ष्मण होके,पांडूरंग शिंदे, राजाभाऊ वाघमारे, गोविंद होके,विजय दादाराव साळवे, देविदास होके, व महादु धूमाळ यांच्यासह बहुसंख्य हमाल माथाडी कामगार या एकदिवसीय कामं बंद आंदोलनात सहभागी होते.

## क्रिडा महोत्सवाच्या माध्यमातून

होणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मानसी चव्हाण, आदित्य कराड यांनी केले. यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेतील सर्व मुख्याध्यापक, क्रीडाशिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडा महोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित यांचे या स्पर्धेवर जातीने लक्ष असून स्पर्धा यशस्वी करण्यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे सर्व क्रीडा शिक्षक परिश्रम घेत आहे येत्या १२ जानेवारी रोजी या क्रीडा महोत्सवाचा समारोप होत आहे.

## आंबेडकरी विचारवंत

सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.श्री. एम. एस. घोक्षे गुरुजी मृत्यूसमयी ८४ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर गेवराई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अनेक मान्यवर तथा प्रतिष्ठित नागरिक यावेळी उपस्थित होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त असून सामाजिक हानी झाल्याचे मत व्यक्त होत आहे.

## आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या

मार्चचे आयोजन ही करण्यात आले आहे.सदर बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे संबोधित करणार आहेत.या करिता राज्यातील सर्व जिल्हा, तालुका,अध्यक्ष,पदाधिकारी, सभासद यांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक चंद्रकांत सोनावणे अध्यक्ष,औरंगाबाद,दिक्षा गायकवाड महिला जिल्हाध्यक्ष , श्यामभाई बागुल प्रसिद्धी आणि प्रसारण प्रमुख औरंगाबाद, मराठवाडा प्रदेश अध्यक्ष सय्यद सलीमबापु यांनी केले आहे.

## पसायदान सेवा प्रकल्पात

दाम्पत्याने स्वत:ची वडीलोपार्जीत शेती अन्? घर विकून ढेकणमोह येथील उजाड माळराणावर पसायदान सेवा प्रकल्प उभा केला... प्रचंड संघर्ष अन्? पावलो पावली आडचणी आल्या तरी त्यांनी प्रत्येक अडचणीवर हीमतीने मात करत वंचीत मुलांच्या सेवेचे काम थांबवले नाही... सुरूवातील पंधरा- वीस वंचीत मुलांच्या साथीने सुरू झालेल्या पसायदान सेवा प्रकल्पात आज ८० पेक्षा अधिक मुलांचे पालन, पोषण, शिक्षण आणि संगोपण होत आहे... १२ जानेवारी २०२५ रोजी पसायदान सेवा प्रकल्पाची मातृसंस्था असलेल्या ज्ञानदिप संस्थेचा तपपुर्ती वर्धापण आहे... जो उद्देश अन्? दृष्टीकोण समोर ठेवून उभा पसायदान प्रकल्प उभा राहीला... तिथे नेहमीच विविध सांस्कृतीक, सामाजिक अन्? समाजाभीमूख उपक्रम राबवले जातात.. दरम्यान पसायदान प्रकल्पाचा तपपुर्ती वर्धापण दिन, राष्ट्रमाता माँ. जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती असा दुग्ध- शर्करा योग जुळून आलेला आहे... अशा या दुग्ध- शर्करा योगात पसायदानचे काम वंचीत मुलांचे पालन, पोषण, संगोपण आणि शिक्षण ईतकेच मर्यादीत नाही तर यापुढे जावून कवी, लेखक, साहीत्तीक अशा क्षेत्रातील प्रतिभावंतांचे आम्ही देणे लागतो म्हणून स्मृतीशेष स्व. सतीष दराडे मंचची स्थापना होत आहे... या सार्या औचित्यातून राज्यातील प्रसिध्द गझलकार यांचा गझल मुशायरा रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी पसायदान सेवा प्रकल्पावर आयोजित करण्यात आला आहे... यावेळी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अतुलनीय कार्य केलेल्या व्यक्तींना युवा पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे... पृथ्वीवरील स्वर्ग असलेले पसायदान सेवा प्रकल्पातील निसर्गरम्य ठिकाण, गुलाबी थंडीत वंचीत मुलांच्या साक्षीने प्रसिध्द गझलकारांची जुगलबंदी... हे सारे गझलप्रेमींसाठी ही एक पर्वणी ठरणार आहे. यावेळी थोर समाजसेवक दत्ता बारगजे, दिपक नागरगोजे, डॉ. दत्ता नलावडे, प्रसिध्द गायक भरतअण्णा लोळगे, समाजसेवक गौतम खटोड, समाजभूषण नितिनचंद्र कोटेचा, अशोक खाडे, बंडू गाडीवान अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या गझल मुशायरा अन्? युवा पुरस्कार वितरण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन पसायदान सेवा प्रकल्प आणि स्व. सतीष दराडे गझल मंच यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पत्रकारितेतून समाजाचा विकास झाला पाहिजे -शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे



जालना । प्रतिनिधी

पत्रकारांनी आपल्या पत्रकारितेतून समाजाचा विकास झाला पाहिजे असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी शिवसेना तालुका कार्यालय बदनापूर येथे दर्पण दिनानिमित्त आयोजित पत्रकार सत्कार सोहळ्यात मांडले. सहा जानेवारी रोजी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे पहिले मराठी भाषेतील वृत्तपत्र सुरू केले होते म्हणून महाराष्ट्रात ६ जानेवारी हा पत्रकार दिन दर्पण दिन म्हणून साजरा केला जातो त्यानिमित्त बदनापूर तालुका शिवसेनेच्या वतीने मान्यवराच्या हस्ते उपस्थित पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बदनापूर विधानसभा संघटक कैलास दुधानी तर प्रमुख पाहुणे म्हणून अमोल दाभाडे शिवसेना शहरप्रमुख, मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष आनंद इंदाणी, डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष किशोर सिरसाठ तसेच आक्रम भाई व रफिक भाई,हे मंचावर उपस्थित होते.

ते पुढे बोलताना आपल्या पत्रकारितेतून पत्रकारांनी वंचित समाजाला जागृत करून आपल्या लेखणी या शस्त्राचा वापर सकारात्मक ध्येय ठेवून पत्रकारीतेत आधुनिक बदल स्वीकारावेत असे आवाहन करून पत्रकार बांधवांना दर्पण दिनानिमित्त शुभेच्छा.. दिल्या.मराठी पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष आनंद इंदाणी यांनी बदनापूर तालुक्यातील पत्रकार भवन साठी जागा उपलब्ध करून पत्रकार यांना एक नवीन व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात यावे असे आवाहन करण्यात आले.यावे ज्येष्ठ पत्रकार संतोष सारडा,संजय भुजाळ, रफिक भाई, आक्रम भाई , गजानन घनघाव ,नारायण ब्राह्मणे,नजागत सर,अमृत तारो सर, कैलास वैद्य,भागवत पवार,दाड सर,आदिल भाई, आदिंसह उपस्थित पत्रकार बांधवांचा शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या वतीने सन्मान देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल दाभाडे यांनी केले, सुत्रसंचलन कैलास वैद्य यांनी केले तर आभार देवा ढाकणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश चोरमारे, दिपक दिघे,सुरेश घोरपडे, किशोर घोरपडे, योगेश वीर, गजानन दिघे,संजय सपकाळ, आदी सह शिवसेना पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले

## बीड -पंढरपूर सवलत योजनासह ई-बस सेवा एकादशीच्या मुहूर्तावर सुरू



बीड । प्रतिनिधी

बीड विभागात नवीन दोन ई बसेस दाखल झालेले असून सदर बसेस बीड ते पंढरपूर मार्गावर आज दि ९जानेवारी पासून सुरू करण्यात येत आहेत.

बीड ते पंढरपूर सकाळी ०६३०,०८००,दुपारी ०५०० वाजता.

तर परतीला पंढरपूर ते बीड सकाळी ०८००,दुपारी ०१००,०२३० अशी वेळ असणार आहे. सदर बस मध्ये अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशास मोफत प्रवास, महिला सन्मान योजना अर्धे तिकीट व ज्येष्ठ नागरीक प्रवाशी अर्धे तिकीट लागू असणार आहे. बसचा मार्ग चौसाळा येरमाळा बार्शी कुर्डूवाडी पंढरपूर असा असणार आहे.बीड विभागात एकूण ई बस ची संख्या ३९ झालेली आहे. यामध्ये नऊ मीटरच्या १९ व १२ मीटर च्या २० बसेस चालनात आहेत. वरील प्रमाणे बसेस या खालील मार्गावर चालनात आहेत. बीड परळी -४ बीड पुणे ९ बीड स्वारगेट २ बीड लातूर १ बीड पंढरपूर ३ बीड अंबेजोगाई १ तर ९ मीटर बीड छत्रपती संभाजीनगर ८ माजलगाव ३ सोलापूर ८ अशा ३९ बसेस उपलब्ध असणार आहेत. लवकरच बीड नांदेड,बीड लातूर उमरगा तसेच बीड ते परभणी मार्गावर ही बसेस चालू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

## गितांजली लव्हाळे-वानखडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कारा पाठोपाठ आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील निर्भिड पत्रकार तथा इंग्लिश स्कूलच्या शिक्षिका श्रीमती गितांजली लव्हाळे वानखडे मॅडम यांना नुकताच राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला होता. त्या पाठोपाठ त्यांना मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर झाला आहे. सदर पुरस्कार १२ जानेवारी रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. एकाच आठवड्यात दोन-दोन पुरस्कार जाहीर झाल्यामुळे सध्या त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिवाय वडवणी शहरातील अनेक मान्यवरांसह विविध संस्थांनी त्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या बाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यासह जिल्ह्यात एक निर्भिड महिला पत्रकार म्हणून गितांजली लव्हाळे वानखडे मॅडम काम करत आहेत.

वडवणी तालुक्यामध्ये खमक्या जिगरबाज डॅशिंग महिला पत्रकार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. तसेच त्या इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून अध्यापनाचे ही काम करत आहेत. पत्रकारिता आणि शिक्षणा सारख्या पवित्र क्षेत्रात काम करत असताना त्यांनी वडवणी पोलीस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता कमिटीच्या सदस्या म्हणून यशस्वी काम करत आहे. या वेळी त्यांनी अनेक महिलांना मदत आणि न्याय मिळवून दिला आहे. त्याच बरोबर त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी भरीव काम केले आहे. त्या नेहमी गरजू महिलांना मोफत साड्यांचे व गरीब विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करत आहेत. या त्यांच्या सर्व कार्याची दखल घेत त्यांना नुकताच मैत्री फाउंडेशन महाराष्ट्राच्या वतीने शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. त्या पाठोपाठ त्यांना मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सदरील पुरस्कार रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्यदिव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार पाठोपाठ आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५ या नवीन वर्षामध्ये जाहीर झाल्यामुळे सध्या त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दोन दोन पुरस्कार मिळाल्याबद्दल श्रीमती गितांजली लव्हाळे वानखडे मॅडम यांचा वडवणी शहरातील अनेक मान्यवरांसह विविध संस्थांनी सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## नैराश्य, चिंता आणि तणाव महिलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करतात -डॉ. पूनम तागड

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या शासकीय ग्रामीण रुग्णालय पाटोदा आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला (अंतर्गत) तक्रार निवारण कक्षाच्या वतीने दि. ०७ जानेवारी २०२५ रोजी महिलांच्या लैंगिक समस्या आणि मानसिक आरोग्य या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. इम्रान शेख, वैद्यकीय अधिकारी डॉ. पूनम तागड मॅडम, सिस्टर काळे मॅडम, श्री. दिशांत भारती व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यशाळेच्या समन्वयक प्रा. ज्योती रकटे यांनी केले. महिलांच्या चांगल्या आरोग्यासाठी शासनाच्या वतीने अशा शिबिराचे आयोजन करण्यात येते. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात महिलांची वैद्यकीय तपासणी व मानसिक आरोग्य या विषयावर प्रमुख पाहुणे डॉ. इमरान शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. युवकांनी १८ ते ३० वयोगटात वेगवेगळ्या चांगल्या सवयी लावून आपले मानसिक आरोग्य सुधारावे, वाईट सवयी दूर कराव्यात, इंटरनेटचा वापर कमी करावा, मोबाईलचा वापर कमी करावा, वाचन खेळ, वेगवेगळ्या स्पर्धेत सहभाग घ्यावा आणि मानसिक तणावापासून दूर राहण्याचे आव्हान डॉ. शेख यांनी केले. जीवनातील घटना आणि हार्मोनल बदल स्त्रियांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करू शकतात. सामाजिक अपेक्षा आणि स्त्रियांवरील दबाव, तसेच महिलांना माता, पत्नी आणि व्यावसायिक म्हणून त्यांच्या भूमिकांशी संबंधित अतिरिक्त दबावांचा सामना करावा लागतो. एकाधिक जबाबदाऱ्यांमध्ये संतुलन राखणे जबरदस्त असू शकते आणि यामुळे तणाव, चिंता आणि नैराश्य देखील वाढू शकते.हार्मोनल बदल जे स्त्रियांना आयुष्यभर अनुभवतात. तारुण्य, गर्भधारणा, प्रसूतीनंतरचा कालावधी आणि रजोनिवृत्ती या सर्वांमध्ये लक्षणीय हार्मोनल चढउतार असतात ज्यामुळे मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. लिंग-आधारित हिंसा आणि आघात दुर्दैवाने, स्त्रिया देखील लिंग-आधारित हिंसा आणि आघात अनुभवण्याची अधिक शक्यता असते, ज्याचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर दीर्घकाळ परिणाम होऊ शकतो. लैंगिक अत्याचार किंवा घरगुती हिंसाचारातून वाचलेल्यांना पी. टी. एस. डी., नैराश्य आणि इतर मानसिक आरोग्य विकारांचा सामना करावा लागतो असे सांगितले.



तर कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात डॉ. पुनम मॅडम यांनी महिलांच्या वेगवेगळ्या आरोग्य विषयी तक्रारी या विषयावर मनोगत व्यक्त केले. आरोग्यासंबंधी समस्या सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळोवेळी वैद्यकीय तपासण्या करून घ्याव्यात व आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले. नैराश्य, चिंता आणि तणाव महिलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करतात. स्त्री लैंगिक समस्या स्त्रीच्या जीवनाच्या गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम करू शकतात, शारीरिक आरोग्य, भावनिक कल्याण आणि घनिष्ट संबंधांवर परिणाम करतात. हार्मोनल असंतुलन, जसे की रजोनिवृत्ती, गर्भधारणेदरम्यान किंवा काही औषधे घेतल्यास, लैंगिक इच्छा आणि कार्यावर परिणाम होऊ शकतो. नैराश्य, चिंता आणि तणाव महिलांच्या मानसिक आरोग्यावर तसेच लैंगिक इच्छा आणि कार्यावर लक्षणीय परिणाम करू शकतात. मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, मज्जासंस्थेचे विकार आणि तीव्र वेदना यासारख्या परिस्थितींचा स्त्रियांच्या लैंगिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. वर्तमान आणि मागील वैद्यकीय परिस्थिती, जसे की मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा थायरॉईड विकार आदी. भूतकाळातील लैंगिक शोषण किंवा आघाताचे अनुभव लैंगिक बिघडाचे कारण असू शकते. नैराश्य, चिंता आणि तणाव मानसिक आरोग्य, लैंगिक इच्छा आणि कार्यावर लक्षणीय परिणाम करू शकतात असे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय समारोहात प्राचार्य सोमनाथ घाडगे यांनी विद्यार्थ्यांनी आपले जीवन जगत असताना वाईट व्यसनाच्या आहारी जाऊ नये असे आव्हान केले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ लोखंडे बी. बी. यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. गोविंद बामदळे यांनी मानले. या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



## चाचा नेहरु जिल्हास्तरीय बाल महोत्सव अंतर्गत मैदानी खेळांच्या स्पर्धांचे मन्सुरी अन्सार निसार यांच्या हस्ते उदघाटन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय बीडच्या वतीने आयोजित चाचा नेहरु जिल्हास्तरीय बाल महोत्सव अंतर्गत मैदानी खेळांच्या स्पर्धांचे उदघाटन जिल्हा अधिक्षक मन्सुरी अन्सार निसार अहमद व जिल्हा परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव यांच्या हस्ते शुक्रवारी दि.१० जानेवारी रोजी करण्यात आले.

चाचा नेहरू जिल्हास्तरीय बाल महोत्सव अंतर्गत मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आज जिल्हा अधिक्षक मन्सुरी अन्सार निसार अहमद व जिल्हा परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विनोद भोसले संरक्षण अधिकारी ,तालुका संरक्षण अधिकारी उकरे पाटील, पी ओ कांबळे,लहु राऊत, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर चौगुले शेटीबा व क्रीडा शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmaiol.com PHno. ०२४८३-२७१७८७
**जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- ४० दिनांक:-१०/०१/२०२५**

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार दिलीप माणिकराव शिंदे रा. रामगव्हाण ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे पाराजी निवृत्ती जवळकर रा. ता.घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ४०११ दि. १६/१२/२०२४ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं ४६ दिनांक:- ०९/०१/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला पाराजी निवृत्ती जवळकर रा. ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (२१४) मधील प्लॉट नं. ५८ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १२३८ मधील एकुण क्षेत्र १५०.०० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं. ६१
पश्चिम :- प्लॉट नं. ५७
दक्षिण :- १२ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
उत्तरेस : प्लॉट नं. ५९

या वरील चतु:सिमा मधील १५०.०० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**

Daily Rajya Loktantra Date_11-01-2025

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME WAS
1)KAMALBAI RATHOD
NOW MY NEW NAME KAMAL KAILASH RATHOD
ADDRESS
AT. RAMNAGAR TANDA. TQ. AMBAD, DIST. JALNA (431204)
7666861799

Daily Rajya Loktantra Date_11-01-2025

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME WAS
1)KAILAS RATHOD
NOW MY NEW NAME KAILASH RATHOD
ADDRESS
AT. RAMNAGAR TANDA. TQ. AMBAD, DIST. JALNA (431204)
7666861799

Daily Rajya Loktantra Date_11-01-2025

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME WAS
1)MANOJ RATHOD
NOW MY NEW NAME MANOJ KAILASH RATHOD
ADDRESS
AT. RAMNAGAR TANDA. TQ. AMBAD, DIST. JALNA (431204)
7666861799

# संयुक्त किसान मोर्चाचा राष्ट्रीय कृषी पणन धोरणाला विरोध

## १३ जानेवारी रोजी मसुद्याच्या प्रती जाळण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

संयुक्त किसान मोर्चाने केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय कृषी पणन धोरणाच्या मसुद्याचा विरोधात दंड थोपटले आहेत. केंद्र सरकार तीन काळे कृषी कायदे पुन्हा राबवण्याचा डाव आखत असल्याची टिकाही संयुक्त किसान मोर्चाने केली आहे. तर देशभरातील शेतकऱ्यांनी १३ जानेवारी रोजी या धोरणाच्या प्रती तहसील कार्यालयासमोर जाळण्याचं आवाहन संयुक्त किसान मोर्चाने केलं आहे. तसेच २६ जानेवारी रोजी पंजाबमध्ये ट्रॅक्टर मोर्चा काढण्याचा निर्धार केला आहे. या मोर्चात राष्ट्रीय कृषी पणन धोरण मसुदाचा विरोध करण्यात येईल आणि स्वामिनाथन समितीच्या फॉर्मुल्यानुसार हमीभाव, कायदेशीर खरेदी हमी, शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी आणि कामगारांसाठी हक्कांची मागणी केली जाईल, असंही संयुक्त किसान मोर्चाने पत्रकात स्पष्ट केलं आहे.



मोगा येथील महापंचायतीमध्ये ९ जानेवारी रोजी शेतकऱ्यांचा सहभाग घेतला होता. याच महापंचायतीमध्ये नवीन कृषी धोरण मसुद्याचा विरोध करण्याचा ठराव संमत करण्यात आला. तसेच स्वामिनाथन समितीच्या फॉर्मुल्यानुसार हमीभाव कायदेशीर गॅरंटी, खरेदी, दिल्लीत केलेल्या करारांचे अंमलबजावणी आणि सर्व शेतकऱ्यांसाठी कर्ज माफीसाठीही ठराव संमत केल्याचं पत्रकात सांगण्यात आलं आहे. या महापंचायतीमध्ये बलबीर सिंग राजेवाल, जोगींदर सिंग उगरहान, राकेश टिकैत, हरमीत सिंग कडियान, डॉ. दर्शनपाल, रामिंदर सिंग पटियाला, प. कृष्णप्रसाद, बूटा सिंग बुरजगिल, हरिंदर सिंग लखोवाल, मनजीत सिंग धनर, डॉ. सतनाम सिंग अजनाला, पुरुषोत्तम शर्मा, बलदेव सिंग निहालगढ़, रुल्दू सिंग मंसा, राजन क्षीरसागर, जोगींदर नैन या नेत्यांची उपस्थिती होती. त्यामुळे नवीन कृषी पणन धोरणावरून पुन्हा एकदा वातावरण तापण्याची चिन्हं दिसू लागली आहेत.

केंद्र सरकारने शेतकरी नेते जगजितसिंह डल्लेवाल यांच्याशी चर्चा करावी, अशी मागणी संयुक्त किसान मोर्चाने केली आहे. विविध मागण्यांसाठी डल्लेवाल मागील ४६ दिवसांपासून आमरण उपोषणावर बसले आहेत. परंतु केंद्र सरकार त्यांच्या आंदोलनाची दखल घ्यायला तयार नाही. त्यामुळे डल्लेवाल यांच्याशी अघटीत घडले तर त्याची संपूर्ण जबाबदारी केंद्र सरकारची असेल, असा इशाराही संयुक्त किसान मोर्चाने पत्रकात दिला आहे. संयुक्त किसान मोर्चाच्या ६ सदस्यांची एकता समिती शुक्रवारी (ता.१०) खनौरी आणि शंभू सीमेवर भेटीसाठी जाणार आहे. तसेच १५ जानेवारी रोजी पटियालामध्ये दोन्ही गटांची संयुक्त बैठक आयोजित करण्याचे आमंत्रणही संयुक्त किसान मोर्चाने दिल्याचे पत्रकात म्हंटले आहे. तसेच पंजाब सरकारने नवीन कृषी पणन धोरणाचा मसुदा नाकारण्यासाठी विधानसभेचं विशेष अधिवेशन तातडीने बोलविण्याची मागणी देखील संयुक्त किसान मोर्चाने केली आहे.

संयुक्त किसान मोर्चाकडून २४ आणि २५ जानेवारी रोजी दिल्लीमध्ये राष्ट्रीय परिषद बैठक आयोजित करणार आहे. या परिषदेमध्ये आगामी कार्यक्रमांचा विचार करण्यात येईल, असंही पत्रकात सांगण्यात आलं आहे.

# या पक्ष्याची अंडी असतात कोंबडीपेक्षाही महाग



भारतातल्या ग्रामीण भागात कुक्कुटपालन हा जोडधंदा आहे. अनेक शेतकरी शेतीसोबत कोंबड्या पाळतात, तर अनेक जण पोल्ट्री फार्म सुरू करून हा व्यवसाय करतात. त्यातून लाखो रुपयांचं उत्पन्न मिळवतात. पण असाच आणखी एक पक्षी आहे, ज्याची अंडी कोंबडीच्या अंड्यांपेक्षा महाग आहेत. पण त्या पक्ष्याला पाळण्यासाठी लायसन्स असावं लागतं.

फार कमी लोकांना माहिती असेल की ग्रामीण भागात आणि जंगलात कवडा नावाचा एक पक्षी आढळतो. या पक्ष्याला हिंदीत तितर असं म्हणतात. हा पक्षी वर्षभरात जवळपास ३०० अंडी घालतो. तुम्ही कवडापालन करून कुक्कुटपालनापेक्षा जास्त नफा मिळवू शकता. कवडा पक्ष्यांची अंडी विविधरंगी असतात. त्यात कार्बोहायड्रेट्स, प्रोटिन, फॅट आणि मिनरल्स मुबलक प्रमाणात असतात. प्रति ग्रॅम पिवळ्या बलकामध्ये १५ ते २३ मिलिग्राम कोलेस्टेरॉल आढळते. अनेक प्रकारच्या आजारांमध्ये कवडा पक्ष्यांच्या अंड्यांचं सेवन करण्याचा सल्ला दिला जातो.

का लागतं लायसन्स

कवडा हा जंगली पक्षी आहे. त्याचं मांस खूप चविष्ट असतं आणि खवैये मोठ्या आवडीने खातात. सध्या या पक्ष्यांची संख्या सातत्याने कमी होत आहे. याच कारणामुळे भारत सरकारने त्याच्या शिकारीवर बंदी घातली आहे. कवडा पालन करायचं असेल तर त्यासाठी सरकारकडून लायसन्स घ्यावं लागेल. हा पक्षी जन्मानंतर ४५ ते ५० दिवसांत अंडी घालण्यास सुरुवात करतो. त्याचा व्यवसाय फार कमी वेळात सुरू करता येतो. सरकार शेतकऱ्यांना हा व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून आर्थिक मदतही करतं. असं केल्याने कवडा पक्ष्यांची संख्याही वाढेल आणि शेतकऱ्यांना नफाही मिळेल.

अन्न आणि जागेची गरज कमी

कवडा पक्ष्यांचा आकार लहान व वजन कमी असल्याने त्याला अन्न व जागेची गरजही कमी असते. व्यवसायासाठी गुंतवणूकही खूप कमी असते. केवळ ४-५ कवडा पक्ष्यांचं पालन करून त्याचा व्यवसाय सुरू करता येतो. त्याचं मांसही कोंबडीपेक्षा चांगल्या किमतीत बाजारात विकलं जातं. ज्यातून तुम्ही चांगले पैसे कमवू शकता.

# रॉक फॉस्फेट बागेसाठी उत्तम पर्याय ;उत्पादनात होणार वाढ

रॉक फॉस्फेट बागेत कशासाठी वापरले जाते. रॉक फॉस्फेट हा फॉस्फेटचा महत्त्वाचा नैसर्गिक स्त्रोत आहे. आणि रासायनिक खतामध्ये कच्चा माल म्हणून वापरला जातो. रॉक फॉस्फेटचा थेट वापर, आम्ली मातीसाठी योग्य असल्याचे आढळले आहे. कारण कमी पीएच वर विरघळण्यास मदत करते व वनस्पतींना फॉस्फेट चे उपलब्ध स्वरुप वाढवते.

ट्रिपल सुपर फॉस्फेट (४५ टक्के पी) हे प्रामुख्याने मोरोक्को येथील खाणीतून आयात करावे लागते. हे खत प्रदेशातील आम्लधर्मी, लोहयुक्त जमीनीमध्ये चांगल्या प्रकारे विरघळते. मात्र त्याची अधिक किंमत अडचणीची ठरते. तसेच अधिक लोह असलेल्या जमीनीमध्ये कमी सामू असताना त्यातील स्फुरद बांधले जाते. ते पिकांना वापरता येत नाही. फॉस्फेट रॉक या खतामध्ये ८ ते १२ टक्के स्फुरद असून ते तुलनेने स्वस्त आहे. आम्लधर्मी जमीनीमध्ये वापरण्यास योग्य आहे. रॉक फॉस्फेट हे आपल्या दातांमध्ये किंवा हाडामध्ये आढळणाऱ्या कॅलशियम फॉस्फेटप्रमाणे आहे ते कमी असलेल्या मातीमध्ये उपयुक्त करु शकते. मका आणि वाटाणा या पिकांमध्ये रॉक फॉस्फेट, ट्रिपल सुपर फॉस्फेट आणि खतांचा अजिबात न वापरता प्रयोग करण्यात आले. आणि रॉक फॉस्फेट या दोन्हीही पिकातील उपलब्धता सारखीच आहे. मात्र खतांच्या शेतामध्ये लोहामुळे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक स्फुरद बांधले गेल्याने पिकांना उपलब्ध होत नसल्याचे आढळले.

रॉक फॉस्फेटच्या शेतामध्ये २९९ टक्के अधिक स्फुरद हा सुक्ष्मजीवांच्या कार्यामुळे अधिक उपलब्ध् होत असल्याचे आढळले. रॉक फॉस्फेट हे सावकाश उपलब्ध होणारे खत असून वेगाने मिळते. एकाच वेळी अधिक वापर केल्यास सुक्ष्मजीव आणि पिकांना उचलता येत नाही. पर्यायाने ते मातीमध्ये बध्द होते. मात्र रॉक फॉस्फेट मुळे काही प्रमाणात आम्लता कमी होऊन मॅग्नेशिअम आणि कॅल्शियम सारखे अन्य पोषक घटक उपलब्ध होण्यास मदत होते. त्यांचा पिकांना फायदा होतो.स्फुरद हा महत्त्वाचा घटक असणाऱ्या खनिज साठयांमधुन रॉक फॉस्फेट काढले जाते. यापासून सेंद्रिय स्फुरदयुक्त खत तयार होते. याच्या वापराने वाढणाऱ्या पिकास आवश्यक अन्नद्रव्यांचा दिर्घकाळापर्यंत नियमित पुरवठा होतो. स्फुरद पिकवाढीसाठी अतिशय महत्त्वाचा अन्नघटक असुन प्रकाश संश्लेषण ऊर्जा वहनामुळे स्फुरदाची महत्त्वाची भुमिका आहे. पिकांना स्फुरदाची गरज अधिक प्रमाणात असुन चांगल्या उत्पादनासाठी दर्जेदार स्फुरदयुक्त खते वापरणे गरजेचे आहे. रॉक फॉस्फेट स्फुरदाचा एक उत्कृष्ट स्त्रोत असुन कॅलशियम व इतर सुक्ष्म अन्नद्रव्य सुध्दा रॉक फॉस्फेटमधून मिळतात.



# दिन विशेष

## जागतिक दिवस
## राष्ट्रीय सड़क सुरक्षा सप्ताहाला सुरुवात

### महत्वाच्या घटना

१६१३ : मुघल सम्राट जहागीर ने पहिल्यांदा इस्ट इंडिया कंपनी ला सुरत येथे कारखाना उभारण्यास परवानगी दिली.
१७८७ : विल्यम हर्षेल याने 'टिटानिया' या युरेनसच्या सर्वात मोठ्या चंद्राचा शोध लावला. त्याच दिवशी त्याने 'ओबेरॉन' या युरेनसच्या दुसर्या मोठ्या चंद्राचाही शोध लावला.
१९२२ : मधुमेहावर उपचार करण्यासाठी प्रथमच इन्सुलिनचा वापर करण्यात आला.
१९४२ : दुसरे महायुद्ध जपानी फौजांनी कुआलालंपूर जिंकले
१९६६ : गुलजारीलाल नंदा यांनी भारताचे हंगामी पंतप्रधान म्हणून कार्यभार स्वीकारला.
१९७२ : पूर्व पाकिस्तानचे बांगला देश असे नामकरण करण्यात आले.
१९८० : बुद्धिबळाच्या खेळात नायजेल शॉर्ट वयाच्या १४ व्या वर्षी जगातील सर्वात लहान ईंटरनॅशनल मास्टर झाला.
१९९९ : 'कमाल जमीनधारणा कायदा' रद्द करणारा वटहुकूम केंद्र सरकारकडून जारी
२००० : छत्तीसगड उच्च न्यायालयाची स्थापना
२००१ : एस. पी. भरुचा यांनी भारताचे ३० वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२००९ : स्लमडॉग मिलियनर या चित्रपटाला ६६ वा. गोल्डन ग्लोब अवार्ड मिळाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : जॉन ए. मॅकडोनाल्ड कॅनडाचे पहिले पंतप्रधान (मृत्यू: ६ जून १८९१)
१८५८ : श्रीधर पाठक हिन्दी कवी, लखनौ येथे भरलेल्या पाचव्या हिन्दी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (मृत्यू: १३ सप्टेंबर १९२६)
१८५९ : लॉर्ड कर्झन ब्रिटिश मुत्सद्दी आणि भारताचे व्हॉइसराय (मृत्यू: २० मार्च १९२५)
१८९८ : ज्ञानपीठ विजेते साहित्यिक वि. स. खांडेकर यांचा जन्म.
१९२८ : थॉमस हार्डी इंग्लिश लेखक आणि कवी (जन्म: २ जून १८४०)
१९४४ : शिबू सोरेन झारखंडचे ७ वे मुख्यमंत्री आणि खासदार आशा खाडिलकरआशा खाडिलकर
१९५४ : बाल मजुरांच्या विरुद्ध आवाज उचलणारे आणिनोबेल पारितोषिकविजेते कैलास सत्यार्थी यांचा जन्म.
१९५५ : आशा खाडिलकर उपशास्त्रीय व नाट्यसंगीत गायिका
१९६६ : स्वतंत्र भारताचे तिसरे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांचे ताश्कंद येथे निधन झाले त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' सन्मानाने गौरविण्यात आले होते. (जन्म: २ आक्टोबर १९०४)
१९७३ : क्रिकेटपटू खेळाडू द. ग्रेट इंडियन वॉल राहुल द्रविड यांचा जन्म.
१९८३ : घनश्यामदास बिर्ला उद्योगपती व शिक्षण महर्षी (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९७ : भबतोष दत्ता अर्थतज्ञ (जन्म: २१ फेब्रुवारी १९११)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२८ : थॉमस हार्डी इंग्लिश लेखक आणि कवी (जन्म: २ जून १८४०)
१९५४ : सर जॉन सायमन स्वातंत्र्यपूर्व काळात भारताला राजकीय सुधारणा देण्यासाठी नेमलेल्या 'सायमन कमिशन' या आयोगाचे अध्यक्ष. क्लेमंट ॲटली हे देखील या आयोगाचे एक सदस्य होते, जे पुढे इंग्लंडचे पंतप्रधान झाले. (जन्म: २८ फेब्रुवारी १८७३)
१९६२ : भारतीय कम्युनिस्ट पार्टी चे नेता अजय घोष यांचे निधन.
१९६६ : स्वतंत्र भारताचे तिसरे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांचे ताश्कंद येथे निधन झाले. त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' सन्मानाने गौरविण्यात आले होते. (जन्म: २ आक्टोबर १९०४)
१९८३ : घनश्यामदास बिर्ला उद्योगपती व शिक्षण महर्षी (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९० : भारतीय संगीतकार राम चतुर मलिक यांचे निधन.
१९९७ : भबतोष दत्ता अर्थतज्ञ (जन्म: २१ फेब्रुवारी १९११)
२००८ : य. दि. फडके लेखक व इतिहाससंशोधक (जन्म: ३ जानेवारी १९३१)
२००८ : सर एडमंड हिलरी माउंट एव्हरेस्टवर सर्वप्रथम चढाई करणारे न्यूझीलंडचे गिर्यारोहक (जन्म: २० जुलै १९१९)

# तंत्र मटकी लागवडीच

एक परिचित कडधान्य. मटकी ही वर्षायू वनस्पती फॅबेसी कुलाच्या फॅबॉइडी उपकुलातील असून तिचे शास्त्रीय नावविग्ना ॲकॉनिटिफोलिया आहे. ती मूळची भारत आणि पाकिस्तान या देशांतील आहे. अमेरिकेची संयुक्त संस्थाने, ऑस्ट्रेलिया, थायलंड आणि आशियाच्या अन्य भागांत तिची लागवड केली जाते. मटकी वनस्पती कमी पाण्यावर तग धरू शकत असल्यामुळे कोरडवाहू भागात तिचे पीक घेतले जाते.

मटकीचे झुडूप जमिनीलगत पसरून आणि तिला आच्छादन करून वाढते. ते सुमारे ४० सेंमी. उंच वाढते. तिच्या जवळजवळ वाढणाऱ्या फांद्यांवर भरपूर लव असते. पाने संयुक्त व त्रिदली असतात; प्रत्येक पिच्छिकेचे ३५ भाग असतात. अनुपर्णे अरुंद व टोकदार असतात. खोडावर लहान पिवळ्या फुलांच्या मंजिऱ्या लांबट दांड्यावर येतात. शेंगा लहान, गोलसर, २६ सेंमी. लांब आणि तपकिरी असून त्यात ४९ बिया असतात. बिया वेगवेगळ्या रंगांच्या असून बहुधा पिवळट तपकिरी, पांढरट हिरव्या किंवा ठिपकेदार काळ्या असतात. परागण कीटकांमार्फत होते.

शिफारशीत जाती : विदर्भासाठी मोट नं. ८८ (उत्पादन एकरी २-३ क्विंटल) पश्चिम महाराष्ट्रासाठी एमबीएस- २७ (उत्पादन एकरी ३-४ क्विंटल) मोट नं. ८८ हे वाण भुरी रोगास काही प्रमाणात बळी पडते, तर एमबीएस- २७ हे वाण भुरी रोगास काही प्रमाणात प्रतिकारक आहे.

जमीन : हलकी मध्य प्रकारची जमीन, कमी पाणी धारण क्षमतेची, पावसाच्या पाण्याचा त्वरित निचरा होणारी जमीन लागते. चोपण, क्षारयुक्त, पानथळ जमिनीत मटकीची लागवड करू नये. कमी पावसाच्या प्रदेशात या पिकाची लागवड मुख्यत्वे केली जाते.

मशागत : जमिनीची खोल नांगरट करून पावसाच्या आगमनानंतर उभी आडवी वखरणी करावी. शेवटच्या वखरणीपूर्वी एकरी ५-६ गाड्या कुजलेले शेणखत टाकून, काडी-कचरा- धसकटे इत्यादी वेचून शेत तयार ठेवावे.

बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी २ ग्रॅम थायरम किंवा २ ग्रॅम कार्बन्डाझिम प्रतिकिलो बियाणे याप्रमाणे प्रक्रिया करावी.

पेरणी : मटकीची पेरणी तिफणीने, सरत्याने, पाभरीने अथवा काकरीच्या साह्याने करतात.

एकरी साधारणतः ५-६ किलो बियाणे लागते. पेरणीसाठी दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. व दोन झाडांतील अंतर १० सें.मी. राखावे. पेरणीची खोली ३-४ सेंमी. राखावी. सलग पेरणीसाठी मूग, उडीद, सोयाबीनप्रमाणे प्रत्येक चौथी, पाचवी अथवा सहावी ओळ खाली ठेवून, नंतर डवऱ्याच्या फेरीवेळी गाळ पाडून घ्यावा. अशा पट्टापेर पद्धतीमुळे उत्पादनात १५-२० टक्क्यांपर्यंत वाढ शक्य होते.

तणनियंत्रण : तण व्यवस्थापनाच्या दृष्टीने सुरूवातीचे ३०-४५ दिवस अत्यंत महत्त्वाचे असतात. नंतर पीक पूर्ण शेत व्यापत असल्याने तणांचा प्रादुर्भाव आपोआपच कमी होतो. पीक २० दिवसांचे व ३० दिवसांचे असताना डवऱ्याचा फेर द्यावा. यादरम्यान निंदणी करून ओळीतील तणांचा बंदोबस्त करावा.खत व्यवस्थापन : पेरतेवेळी एकरी ३० किलो डीएपी व साधारणतः १५ किलो एमओपी द्यावे. पेरणी वेळी एकरी ८ किलो गंधक दिल्यास फायद्याचे ठरते.



## थोडक्यात



### अंबड पालिकेकडून विभाग स्तरीय स्पर्धा

अंबड। प्रतिनिधी

नगर परिषद संचालनालय मुंबई व जिल्हा नगर विकास विभाग जालना यांचे संयुक्त विद्यमाने आयोजीत जिल्हा वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन अंबड येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धा सुरळी पार पडल्या. तसे स्पर्धेमध्ये निवड झालेल्या कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.सदर स्पर्धे मध्ये तीर्थपुरी नगर पंचायत कर्मचारी यांनी मा. शांताराम गोसावी मुख्याधिकारी न. पं. तीर्थपुरी यांचे मार्गदर्शनाखाली विविध क्रीडा स्पर्धेत श्री.बजरंग घुळेकर,किशोर जाधव,सोपान कडुकर,संतोष लवणाडे,विकास साबळे,आकाश नाराळे यांनी सहभाग घेतला व थाळी फेक स्पर्धेमध्ये रामेश्वर कासार यांनी जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळविला, तसेच तीन किलोमीटर चालण्याचा स्पर्धे मध्ये ऋषीकेश गुंजाळ यांनी प्रथम तर बजरंग घुळेकर यांनी द्वितीय क्रमांक व ४*१०० रिले मध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला,तीर्थपुरी नगर पंचायतीची स्थापना झाल्यानंतर प्रथमचं जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धे मध्ये तीर्थपुरी नगर पंचायत कर्मचारी यांनी उल्लेखनिय यश मिळविल्याबद्दल यशस्वी खेळाडूंचे तीर्थपुरी च्या नगराध्यक्षा मा.अलकाताई अण्णासाहेब चिमणे, उपनगराध्यक्ष मा.शैलेंद्र पवार, न.पं.सभापती व नगरसेवक, न. पं. अधिकारी, कर्मचारी अभिनंदन करून विभागीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी सर्व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी दि. ९ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २२ जानेवारी २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### केएसके कृषी महाविद्यालयामध्ये कॅम्पस मुलाखतीचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

सौ. के एस के काकू कृषी महाविद्यालय बीड या ठिकाणी वेटरीना हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने शेवटच्या वर्षांमध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पसचे मुलाखतीचे आयोजन केले होते. ही कंपनी पशु आहार क्षेत्रामध्ये गरजेप्रमाणे आहारपूरक घटक बनवते, शेतकऱ्याना दुग्ध व्यवसाय फायदेशीर मार्गदर्शन करते तसेच वेटझोनच्या माध्यमातून, उत्पादने शेतकऱ्यांच्या दारात पोचवते. वेटरीना हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने व्हेटर्नरी सेल्स ऑफिसर या पदासाठी महाविद्यालयांमध्ये दिनांक ०९/०१/२०२५, गुरुवार रोजी मुलाखतीचे आयोजन केले होते. शेवटच्या वर्षातील २९ विद्यार्थी या मुलाखतीसाठी उपस्थित होते. कंपनीच्या वतीने श्री अमित शिंदे, नॅशनल सेल्स ऑफिसर आणि श्री युवराज खरात, झोनल सेल्स ऑफिसर यांनी या मुलाखती घेतल्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना लवकरच कंपनीच्या वतीने नियुक्तीपत्र दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांना करिअरची संधी उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थी व पालक यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंखे सर म्हणाले की, अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खासगी क्षेत्रासह सरकारी क्षेत्रातही रोजगाराच्या संधी शहरी व ग्रामीण भागातील युवकांसाठी उपलब्ध आहेत त्यासाठी युवकांना कृषिविषयक शिक्षण आत्मसात करण्याची आवश्यकता आहे. तसेच मुलाखतीस उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागा मार्फत विविध क्षेत्रातील नोकरीसाठी कॅम्पस मुलाखतींचे आयोजन केले जाते.


जाहीर प्रगटन

मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज ४२/२०२५ ॲड. आर.आर. शिंदे

श्रीपाद वगैरे विरुध्द निरंक

अर्जदार : १) श्रीपाद बाबुराव रसाळ, वय ४४ वर्ष, धंदा नोकरी पत्ता- जुना धानोरा रोड, सरस्वती विद्यालया जवळ, गणपती नगर, बीड, ता. जि.बीड, २) प्रसाद बाबुराव रसाळ, वय ३८ वर्ष, धंदा खा. नोकरी जुना धानोरा रोड, सरस्वती विद्यालया जवळ, गणपती नगर, बीड, ता.जि.बीड, ३) मंगल तात्याराम वाघमारे, वय ५२ वर्ष, धंदा घरकाम बेलेश्वर मंदिराजवळ, सरस्वती विद्यालया जवळ, गणपती नगर, बीड, ता.जि.बीड, ४) वनमाला ईश्वर कदम, वय ४९ वर्ष, धंदा घरकाम चौदसवाडी कदमवस्ती, मांजरसुंबा, ता.जि.बीड

विरुध्द

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत बाबुराव गणपतराव रसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत बाबुराव गणपतराव रसाळ यांचा मृत्यु दि. १५/१२/२०२४ रोजी गवारी, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र. ३ व ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई वडील व पत्नी यापुर्वीच मयत झालेले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत बाबुराव गणपतराव रसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १० माहे जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २० फेब्रुवारी २०२५.

स्वाक्षरित क. लिपीक (शिक्का) आदेशावरुन स्वाक्षरित अधिक्षक दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड,


# 'दीनदयाळ' बँकेने दर्जेदार सेवा देत ग्राहक, ठेविदारांचा विश्वास संपादन केला -पाटील

अंबाजोगाई । प्रतिनिधी

'विश्वास, विकास आणि विनम्रता' या त्रिसूत्रीने आर्थिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या 'दीनदयाळ' बँकेने दर्जेदार बँकींग सेवा देत ग्राहक, ठेविदारांचा विश्वास संपादन केला असे प्रशंसोद्धगार महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांनी काढले. ते दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या अहमदपूर शाखेस दिलेल्या सदिच्छा भेट प्रसंगी बोलत होते.



महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांनी नुकतीच दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाईच्या अहमदपूर शाखेस सदिच्छा भेट दिली. बँकेच्या सर्वांगिण कार्याची माहिती घेतली. मनोगत व्यक्त करताना मंत्री महोदयांनी बँकेचे मनःपूर्वक कौतुक केले. अल्प कालावधीत बँकेने केलेल्या शाश्वत प्रगतीचा अहवाल घेऊन समाधान ही व्यक्त केले. पारदर्शकता, स्वयंनिष्ठा, भारतीय रिझर्व बँकेचे नियम निकष कायदे कानून याचे पालन करीत संस्था आपली प्रगती साधत असल्याबाबत प्रशंसोद्गार काढले. मागील २८ वर्षांतील प्रगती अत्यंत आदर्श असून ८५० कोटींचा व्यवसाय अल्प कालावधीत करणे तेही सर्व निकषांचे पालन करून ही तारेवरची कसरत असतानाही बँकेने आपला ठसा उमटविला व अहमदपूर शहरात बँकेने चांगले नांव कमावले असल्याचे त्यांनी म्हटले. भांडवल पर्यक्तता अन्? उत्पादक कर्ज ठेव संकलन कर्ज वितरण यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर व एकसंघ काम करणारे संचालक मंडळ हे या प्रगतीचे गमक असून हे संचालक मंडळ बँकेचे उत्तरोत्तर प्रगती करेल बाबत त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. मात्र सध्याच्या युगात 'सायबर सिक्युरिटी' हा चिंतेचा विषय असून या सुरक्षा संदर्भात बँकेने काटेकोरपणे लक्ष देऊन लोकहित जोपासावे बाबत अश्वस्थ केले. राज्याचा सहकार मंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर आपण ही दीनदयाळ बँकेला दिलेली पहिलीच भेट असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. तर शासकीय पातळीवरील सहकार विभागाचे अखत्यारीत येणाऱ्या सर्व विषयांबाबत मंत्रिमहोदयांनी दीनदयाळ बँकेस सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल बाबत आश्वासीत ही केले. तसेच यावेळी त्यांनी 'दीनदयाळ' बँकेच्या कार्यप्रणाली बाबत प्रशंसोद्धगार काढून माननीय संचालक मंडळाचे कौतुक केले. व 'दीनदयाळ' बँकेने दर्जेदार, तत्पर, अद्ययावत, गतिमान बँकींग सेवा देत ग्राहक, ठेविदारांचा विश्वास संपादन केला आहे असे ते म्हणाले. बँकेचे स्थानिक सल्लागार देवेंद्र देवणीकर यांनी आग्रहाने मा.मंत्री महोदयांनी अन्य कार्यक्रमातून वेळ काढून आमंत्रण स्वीकारले व बँकेच्या शाखेस भेट दिली. त्याबद्दल बँकेच्या वतीने आभार मानले. प्रारंभी भारतमाता व दीनदयाळजी उपखध्याय यांच्या प्रतिमापूजन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. समारोपपर भाषणात बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी बँकेच्या एकूण कार्यप्रणालीचा व एकसंघ सकारात्मक काम करण्यास संचालक मंडळ कार्यरत असल्याबाबत माहिती दिली. सोबत बँकेच्या सांख्यिकीय प्रगतीचा आलेख ही उपस्थितांसमोर मांडला. मंत्री महोदयांनी अगदी अल्पावधीतच केलेल्या विनंतीला मान देत आपले निमंत्रण स्वीकारून दीनदयाळ बँकेस भेट दिल्याबाबत ऋण व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून सहकार भारतीच्या वतीने प्रदेश कार्यकारणी सदस्य सौ.शरयूताई हेबाळकर (माजी अध्यक्ष व संचालिका) व कार्यकर्ते सनतकुमार बनवसकर यांनी मंत्री महोदयांचा सहकार भारतीची पुस्तके भेट देऊन सत्कार केला. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बँकेचे संचालक मकरंद कुलकर्णी (सोनेसांगवीकर) यांनी केले तर प्रास्ताविक देवेंद्र देवणीकर यांनी केले. उपस्थितांचे आभार बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी बँकेच्या संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, संचालक मकरंद कुलकर्णी, किरण सुरेशकांबळे हे उपस्थित होते. तर अहमदपूर शहरातील प्रतिष्ठित दिलीपराव देशमुख, भरतराव चामे, शिवानंद हिंगणे, प्रताप पाटील, यशवंत केंद्रे, खेडकर साहेब व बँकेचा ग्राहकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्थानिक सल्लागार देवेंद्र देवणीकर, श्रीकांत भुतडा, तातोडे साहेब, बँकेचे शाखाधिकारी विनोद कान्हेगावकर, अधिकारी नवाडे व कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला.

## रविशंकर विद्या मंदिर शाळेस प्रथम पारितोषिकाचा मान

बीड। प्रतिनिधी

श्री श्री रविशंकर विद्यामंदिर पिंपरगव्हाण रोड बीड येथे 'वीर बाल दिवसाच्या' निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दहावे शिखगुरु श्री गुरुगोविंद सिंह यांचे बलिदानी पुत्र श्री जोरावर सिंह व श्री फतेसिंह यांचे नऊ वर्ष व सहा वर्षाचे असताना शीख संप्रदायाचा सन्मान व अस्मिता हेतू आणि रक्षणार्थ २५ डिसेंबर १७०५ रोजी या दोन वीरपुत्रांनी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या गौरवार्थ २६ डिसेंबर वीर बाल दिवस म्हणून साजरा करावा असे भारत सरकारने निर्देशित केले आहे त्यानिमित्ताने आज शाळेत 'वीर बाल दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर, शाळेचे सचिव श्री शेख पाशा सर, शाळेचे मुख्याध्यापक श्री हंसे सर ,शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांची उपस्थिती होती.

इयत्ता सहावीतील तेजस्विनी बहिर या विद्यार्थिनीने वीर बाल दिना विषयी आपले विचार व्यक्त केले. याच कार्यक्रमाच्या निमित्ताने बीड शहरातील नामांकित इनरव्हील संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेच्या बक्षीसांचेही वितरण करण्यात आले. या चित्रकला स्पर्धेसाठी शहरातील ७ नामांकित शाळांचा सहभाग होता त्यातून श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेतील इयत्ता ७ वर्गातील श्रावणी डोंगरे या विद्यार्थिनीने प्रथम पारितोषिक पटकावले.

शाळेचे सचिव श्री पाशा सर यांच्या हस्ते तिला बक्षीस व प्रमाणपत्र देऊन तिचा सत्कार करण्यात आला. तसेच या चित्रकला स्पर्धेत सहभागी होणार्या स्वानंदी पवळ, अनन्या खेत्रे ,श्रुती उजेगर, राजनंदिनी मगर, तेजल कुटे, तेजस्विनी बहिर स्वरांजली सोनवणे , सार्थक सुरवसे या सहभागी विद्यार्थ्यांनाही पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील चित्रकला शिक्षिका विना उजेगर मॅडम यांचे सहकार्य लाभले.

## राजेंद्र मस्कें यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदावर शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांची नियुक्ती करण्यात आली. यापूर्वी जिल्हाध्यक्ष पद आमदार संदीप क्षीरसागर यांच्या कडे होते. बीड विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर खासदार बजरंग बाप्पा सोनवणे व आमदार संदीप क्षीरसागर यांनी पक्ष श्रेष्ठीकडे मागणी करून जिल्हाध्यक्ष पदाची धुरा राजेंद्र मस्के यांच्याकडे सोपवली.



राज्य विधानसभा निवडणुकी नंतर प्रथमच गेली दोन दिवसापासून मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठका चालू होत्या .आज पक्षाचे सर्वेसर्वा खा. मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांची बीड जिल्हा अध्यक्ष पदावर नियुक्ती जाहीर करून नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, बीडचे आ. संदीप भैय्या क्षीरसागर, खा.निलेश लंके, प्रदेश युवा अध्यक्ष महेबूब शेख,माजी आ. पृथ्वीराज साठे,राजेसाहेब देशमुख, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. लोकसभा निवडणुकीनंतर राजेंद्र मस्के यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन शरदचंद्र पवार साहेबांचे नेतृत्व स्वीकारले. अत्यंत चुरशीच्या बीड विधानसभा निवडणुकीत आ. संदीप क्षीरसागर यांच्या विजयासाठी अथक परिश्रम घेतले. बीड जिल्ह्यात शरदचंद्र पवार साहेबांच्या राष्ट्रवादीने बीडचा गड राखला. या विजयात राजेंद्र मस्के व त्यांच्या मित्रमंडळाचे योगदान आहे.आगामी काळात मजबूत संघटन आणि पक्ष विस्तारासाठी राजकीय व सामाजिक कामाचा अनुभव लक्षात घेऊन राजेंद्र मस्के यांची बीड जिल्हा अध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली.या नियुक्ती मुळे जिल्हाभरात पदाधिकारी कार्यकर्ते हितचिंतक यांच्या कडून राजेंद्र मस्के यांचे अभिनंदन केले जात आहे.

## तक्रारदाराच्या तक्रारी निपटारा करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून तक्रार दरबार-पो. अधीक्षक बंसल

जालना । प्रतिनिधी

तक्रारदाराचे तक्रारी निपटारा करण्यासाठी पोलीस स्टेशन स्तरावर अभ्यांगताना त्यांच्या अडीअडचणीचे समास्यांचे निराकरण करण्यासाठी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना भेटण्यासाठी सोयीचे व सुलभ ठरावे व अभ्यांगताना पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना भेटण्यासाठी ताटकळत बसावे लागू नये यासाठी अभ्यांगताना भेटण्याची एक निश्चित वेळ असणे गरजेचे आहे. त्यामुळे श्री. अजयकुमार बंसल पोलीस अधीक्षक जालना यांनी जालना जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी पोलीस स्टेशनला सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी व वरीष्ट पोलीस अधिकारी हे अभ्यांगताना भेटण्यासाठी सोमवार ते शुक्रवार सायंकाळी ०४.०० ते ०६.०० पावेतोचा



वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच इतर वेळी देखील अभ्यांगत हे कोणत्याही पोलीस अधिका- यांना भेटण्यासाठी पाहिजे त्या वेळेत भेटू शकतात. प्रभारी अधिकारी हे नमुद वेळेत अभ्यांगतासाठी भेटण्यास काही कारणास्तव अनुपस्थित असल्यास त्यांच्या दुय्यम अधिकारी यांना अभ्यांगत भेटू शकतात.

तसेच पोलीस प्रशासनाकडून जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी तक्रारीचे निवारण करण्यासाठी आठवड्याच्या दर शनिवारी पोलीस स्टेशनस्तरावर सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० वाजेपावेतो तक्रार निवारण दिन ठेवण्यात आलेला आहे. सदरच्या तक्रार निवारण दिनासाठी सर्व वरीष्ट अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना महिनाभराचे तक्रार निवारणाचे अगोदरच वेळापत्रक देण्यात आले आहे. व तक्रार निवारण दिनाचे व अभ्यांगत भेटीच्या वेळेचे बोर्ड पोलीस स्टेशनच्या दर्शनी भागात लावण्याचे आदेश श्री. अजय कुमार बंसल यांनी पोलीस स्टेशनला दिले आहेत. या सुविधेचा जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन श्री. अजय कुमार बंसल, पोलीस अधीक्षक यांनी जनतेस अहवाल केले आहे.

## इमामपुर येथे रामायण ग्रंथ वाटप, दिपोत्सवाचे अयोजन

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्रात प्रथमच फिरता नारळी श्री एकनाथ महाराजकृत भावार्थ रामायण कथा सोहळा सुरू आहे. बीड जिल्ह्यातील ५१ गावामध्ये ही कथा संपन्न होत आहे. त्यातील दहावी कथा बीड तालुक्यातील इमामपुर येथे शनिवार दि. ४ जानेवारी पासून सुरू आहे. आज शनिवार दि. ११ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता हनुमान मंदीर येथे या भावार्थ रामायण कथेची सांगता होणार आहे.

श्री क्षेत्र आयोध्या धाम येथील श्रीराम मंदिर व श्रीराम लल्ला मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनाचे औचित्य साधून ११ हजार दिवे लाऊन भव्य दिव्य दिपोत्सव साजरा करण्यात येणार आहे. व भावार्थ रामायण सेवा समिती च्या वतीने दोन हजार १०० श्री. एकनाथ महाराज कृत भावार्थ रामायण ग्रंथ वाटप महासंकल्प करण्यात आलेला आहे. तरी त्यातील आतापर्यंत १० गावामधील श्री. हनुमान मंदिरामध्ये ही भावार्थ रामाणयण कथा संपन्न झालेली आहे. तरी श्रीराम मंदिर व श्रीराम लल्ला मूर्तिप्राण प्रतिष्ठा वर्धापन दिनाचे औचित्य साधून आज भावार्थ रामायण ग्रंथ वाटप शुभारंभ श्री. हनुमान मंदिर इमामपुर येथे होणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील रामायनाचार्य, वाचक, सुचक व श्रीराम भक्त मंडळींनी मोठ्या संख्येने या दिपोत्सव व भावार्थ रामायन ग्रंथ वाटप प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीराम भक्त विष्णूदासजी महाराज सुरवसे व श्री भावार्थ रामायण सेवा समिती व श्रीराम भक्त मंडळ इमामपुर यांच्या वतीने करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात ५१ गावातील श्री हनुमान मंदिरामध्ये भावार्थ रामायण कथा होणार आहेत. याची सुरूवात महाजन वाडी येथून १८ ऑक्टोबर २०२४ रोजी योगिराज महाराज गोसावी पैठणकर यांच्या हस्ते सुरू झाली. दरम्यान अंजनवती, घारगाव, लोणी घाट, मोरगाव, पेंडगाव, अंथरवन पिंप्री, श्री. क्षेत्र देहू, श्री. क्षेत्र आळंदी, रौळसगाव आणि इमामपुर येथे ही कथा सुरू आहे.


जाहीरनामा

मा.श्रीमती एफ.बी.बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १६/२०२५

अंजनाबाई वि. निरंक विधीज्ञ श्री. ए.एन. बारगजे

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) अंजनाबाई भ्र. सोनाजी जरकळ, वय ८१ वर्षे, धंदा- घरकाम, राहणार- कोल्हारवाडी ता.जि.बीड, २) सखाराम सोनाजी जरकळ, वय- ५९ वर्षे, धंदा- शेती. राहणार- कोल्हारवाडी ता.जि.बीड, ३) नामदेव सोनाजी जरकळ, वय ४९ वर्षे, धंदा- शेती. राहणार- कोल्हारवाडी ता.जि.बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे सोनाजी अंबादास जरकळ, राहणार कोल्हारवाडी, ता.जि.बीड हे दिनांक २६/०९/२०१८ रोजी कोल्हारवाडी ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयत नामे सोनाजी अंबादास जरकळ, यांची पत्नी असुन अर्जदार क्र.२ व ३ हे मयताचे मुले आहेत.

मयत नामे सोनाजी अंबादास जरकळ, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहू अर्जदार त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सोनाजी अंबादास जरकळ, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०२/२०२५ आहे.

आज दिनांक ०६/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित क. लिपीक सह दिवाणी न्यायालय व स्तर, बीड (शिक्का) आदेशावरुन स्वाक्षरित अधिक्षक दिवाणी न्यायालय, व स्तर, बीड


## नेतृत्व प्रस्थापित होण्यासाठी वक्तृत्व आवश्यक -प्रा. डोळे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

नेतृत्व विकसित होण्यासाठी फर्डे वक्तृत्व असणे गरजेचे आहे, वक्तृत्वातून स्वतः ची ओळख निर्माण झाली पाहिजे असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ. जयदेव डोळे यांनी व्यक्त केले. येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या वतीने आयोजित स्व. प्राचार्य भ. कि. सबनीस राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. जयदेव डोळे यांनी सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वातंत्रवीर सावरकर यांच्या वक्तृत्व शैली बद्दल माहिती दिली. गांधीजी फर्डे वक्ते नव्हते पण आचरणातून त्यांचे नेतृत्व विकसित झाले. तरुण वक्त्यांनी अभ्यासातून, स्पष्ट विचारातून आपली वक्तृत्व क्षमता विकसित करावी असे मत डॉ. जयदेव डोळे यांनी व्यक्त केले . तरुण वक्त्यांनी सभ्य, संयमी भाषेत मांडणी केली तरीही परिणामकारकता साधता येते . संविधानाची मूल्ये जोपासणाऱ्या वक्तृत्व स्पर्धांचे महत्व वाढले पाहिजे असे मत डॉ. जयदेव डोळे यांनी व्यक्त केले.




या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचा अध्यक्षीय समारोप योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या संबोधनाने झाला. स्व. प्राचार्य भ. कि. सबनीस यांच्या विचारकार्याविषयी त्यांनी मत व्यक्त केले.सबनीस सरांचे वाचन प्रचंड होते त्यांनी आपल्या कार्यातून समाज घडविण्याचा प्रयत्न केला, तरुणवर्ग नवनिर्माण करु शकतो ही प्राचार्य सबनीस सरांची धारणा होती.अंबाजोगाईला सबनीस सरांनी बरेच कांही दिले आहे असे मत व्यक्त केले.या वक्तृत्व स्पर्धेच्या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. थारकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वक्तृत्व स्पर्धेचे संयोजक, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. रमेश सोनवळकर यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी यांनी केले तर आभार डॉ. शैलजा बरुरे यांनी मानले. या कार्यक्रमास योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष अँड. जगदीश चौसाळकर, योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रा. माणिकराव लोमटे, प्रा. एन. के. गोळेगावकर, रमण सोनवळकर, जेष्ठ पत्रकार अमर हबीब,प्रा. संभाजी बनसोडे, पी. एन. कुलकर्णी, संतराम कराड, अँड. अजय बुरांडे,मेजर एस. पी. कुलकर्णी, प्रा. डॉ. गणेश पिंगळे, स्पर्धेचे परीक्षक म्हणून खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिगंबर मुडेगावकर, योगेश्वरी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त उपप्राचार्य व्हि. एन. जोशी, बी.एस.पी. एम. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रा. डॉ. होळकर भागवत मसने , विविध महाविद्यालयातून आलेले स्पर्धक विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराईचे प्रशिक्षण तलवाड्यात येऊन गुंडाळले

## स्टुडंट रिलीफ सोसायटीचा असाही प्रताप

**तलवाडा । प्रतिनिधी**

**जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हाभरातील सरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी ताई, आशा वर्कर, जलसुरक्षक यांना प्रशिक्षण देण्यासाठी राज्यस्तरावर राजस्थानच्या स्टुडन्ट रिलीफ सोसायटीची नियुक्ती केली असून या संस्थेने प्रशिक्षण गुंडाळण्याचा सपाटाच लावला आहे. या संस्थेच्या वतीने गुरुवार व शुक्रवारी गेवराई तालुका स्तरावरील प्रशिक्षण गेवराईत घेणे गरजेचे आसतानाही ते तलवाडा येथे जाऊन थातूर मातूर प्रशिक्षण देऊन गुंडाळण्याचा प्रयत्न केला. कोट्यावधी रुपयांची लूट करणाऱ्या या संस्थेवर कारवाई करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.**






राजस्थानच्या स्टुडंट्स रिलीफ सोसायटीला बीड व हिंगोली जिल्ह्याचे प्रशिक्षण राज्यस्तरावरुन देण्यात आले आहे. मात्र या संस्थेला मराठीचे ज्ञान नसतानाही हे प्रशिक्षण सरकारने कसे काय दिले? हा प्रश्न उपस्थित होतो. या संस्थेने बीडमध्ये येऊन थातूरमातूर प्रशिक्षण देऊन जलजीवन मिशनचा बट्ट्याबोळ केला असून जेवढे प्रशिक्षणार्थी कमी येतील तेवढ्यावरच प्रशिक्षण गुंडाळण्याचा सपाटा चालू केला आहे. या संस्थेने परवा आष्टी मध्ये अशाच प्रकारचे प्रशिक्षण गुंडाळले. गुरुवार व शुक्रवारी हे प्रशिक्षण तालुकास्तरावर असताना आणि ते गेवराईत घेणे आवश्यक असतानाही हे प्रशिक्षण तलवाडा येथे जाऊन त्या ठिकाणी सर्वांना बोलावून घेण्याचा नेमका हेतू काय? हे स्पष्ट होत नाही. तालुकास्तरावर जास्तीत जास्त लोक उपस्थित राहतात. ग्रामसेवकाची कामेही पंचायत समिती स्तरावर असतात .सरपंचाची कामे याच ठिकाणी असतात. जवळपास सर्वच कर्मचाऱ्यांची कामे पंचायत समितीमध्ये असतात. त्यामुळे तालुकास्तरावरील प्रशिक्षण त्यांना सोपे जाते. आणि हे मध्यवर्ती ठिकाण असते. म्हणजे सर्वांनाच प्रवासाची अडचण होत नाही. तरीही तालुक्याच्या एका कोपऱ्यात जाऊन तलवाडा येथे प्रशिक्षण घेण्याचा नेमका हेतू काय हे स्पष्ट होत नाही. हे प्रशिक्षण तालुका स्तरावर झाले नसल्याने या ठिकाणी मोजक्या सरपंचांची उपस्थिती राहिली. जवळपासच्या गावच्या आशा वर्कर आणि अंगणवाडी ताई आल्या मात्र याचा लाभ संपूर्ण तालूक्याला मिळाला नाही. अंतर खूप असल्याने आणि वाहनांची सुविधा नसल्याने अनेकजण या प्रशिक्षणापासून वंचित राहिले. बाहेरचे प्रशिक्षक आणून हे प्रशिक्षण गुंडाळण्याचा सपाटा चालू असून केवळ पैसे कमावणे एवढाच या संस्थेचा हेतू आहे. जलजीवन मिशनच्या अंतर्गत प्रशिक्षण देऊन ग्रामपंचायत सक्षम करण्याच्या सरकारच्या हेतुला मात्र यामुळे तिलांजली दिली जात आहे. स्वतःची तुमडी भरण्यासाठी या संस्थेने थातूरमातूर प्रशिक्षण देऊन जिल्ह्यातून कोट्यावधी रुपयाची लूट केली आहे. आणि हे सर्व बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ,जलजीवन मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित बिडिओ मूकपणे सहन करत आहेत. या संस्थेचे मानधन देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची शिफारस आवश्यक असते. ही शिफारस संस्थेला देऊ नये अशी मागणी ग्रामपंचायत स्तरावर सरपंच आणि लोकप्रतिनिधी करत आहेत.

### केवळ दोनच हॉलमध्ये प्रशिक्षण

गेवराई तालुक्यामध्ये जवळपास २०० ते २५० ग्रामपंचायत असताना आणि त्या हिशोबाने किमान हजार लोक उपस्थित राहणे आवश्यक असताना केवळ दोन हॉलमध्ये म्हणजे १०० लोकांचे प्रशिक्षण तलवाडा येथे घेण्यात आले. जवळपास ९०० लोकप्रतिनिधी आणि कर्मचारी या प्रशिक्षणापासून वंचित राहिले.

### बाहेरचे प्रशिक्षक कशासाठी?

बीडमध्ये जवळपास २० यशदा आणि तत्सम सरकार मान्य संस्थांचे प्रशिक्षक असतानाही या संस्थेने बाहेरून प्रशिक्षक आणून प्रशिक्षण चालू केले आहे. वास्तविक पाहता नियमानुसार या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील लोकच असावेत असा प्रघात आहे .मात्र या संस्थेने बाहेरून लोक आणण्याचा नेमका हेतू काय? की लोकांना प्रशिक्षण माहीत होऊ द्यायचे नाही हे स्पष्ट होत नाही.

### जिल्हाभरातून लूट

या संस्थेने यापूर्वी अशाच प्रकारचे बोगस प्रशिक्षण घेऊन जिल्हाभरातून कोट्यावधी रुपयाची लूट केली आहे. एका तालुक्याच्या प्रशिक्षणासाठी या संस्थेला जवळपास दहा ते बारा लाख रुपये मिळतात ही संस्था संपूर्ण लोक उपस्थित असल्याचे दाखवून पूर्ण लोकांची बसण्याची व्यवस्था, त्यांना दिली जाणारी स्टेशनरी ,चहा, नाश्ता तसेच जेवणाचे पैसे पूर्णपणे वसूल करतात .या संस्थेची राज्यस्तरावरून चौकशी करावी अशी मागणी प्रशिक्षक संघटनेने केली आहे.

# जिल्हा पुरवठा विभागाच्या विरोधात हमाल माथाडी कामगारांचे लाक्षणिक कामबंद आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**जिल्हा पुरवठा विभागाकडून हमाल माथाडी कामगार यांची पिळवणूक तर होतच आहे,पण केलेल्या कामाची बिल देण्यास विलंब केला जात आहे. यामुळे जिल्हा पुरवठा विभागाच्या विरोधात दि.१० जानेवारी शुक्रवार रोजी हमाल माथाडी कामगार युनियनचे अध्यक्ष राजकुमार घायाळ यांच्या नेतृत्वाखाली काम बंद आंदोलन करण्यात आले.**



हमाल माथाडी कामगारांच्या अनेक मागण्या बाबत आम्ही वारंवार जिल्हा पुरवठा अधिकारी यांना विनंती करुनही दखल घेतली जात नसल्याने पुन्हा एकदा आंदोलन करावे लागते.त्यामूळे सुरवातीस दि १० जानेवारी शुक्रवार रोजी लाक्षणिक कामबंद आंदोलन करण्यात आले आहे.जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील पुरवठा विभागाच्या गोदामात काम करणाऱ्या हमाल माथाडी कामगार यांना त्यांच्या कामाचा मोबदला तात्काळ देण्यात यावा व इतर विविध मागण्यासाठी हे लाक्षणिक काम बंद आंदोलन करण्यात आले यावेळी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात पुढील मागण्या पूर्ण करण्यात याव्या अशी मागणी करण्यात आली आहे.यामध्ये ऑगस्ट,सप्टें, ऑक्टोबर, नोव्हेंबर,डिसेंबर २०२४ ची नियमित कामाची हमाली तात्काळ मिळावी. यामध्ये गेवराई तहसीलदार यांच्याकडून बिले दाखल

पान ३ वर

## तरुणाकडे सापडली बंदूक पोलिसात गुन्हा दाखल

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील २५ वर्षीय तरुणाकडे बंदूक सापडल्याने आष्टी तालुक्यात खळबळ उडाली आहे. सदरील तरुणा विरोधात आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.नागेश परमेश्वर बोबडे असे तरुणाचे नाव आहे.

आष्टी पोलिसांना बुधवारी (ता.८) बीडसांगवी येथील नागेश परमेश्वर बोबडे यांचे जनावरांच्या गोठ्यात बंदुक आहे अशी माहिती मिळालेवरून आष्टी पोलिसांनी दोन पंचाना सोबत घेऊन सदरील ठिकाणी जाऊन छापा मारला असता नागेश परमेश्वर बोबडे (वय २५) रा. बीडसांगवी ता. आष्टी जि. बीड

यांच्या गोठ्यात बंदूक आढळून आली.

पोलिस अमलदार बब्रुवान अभिमान वाणी यांच्या फिर्यादीवरून बुधवारी (ता ८) आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक विक्रांत हिंगे हे करत आहेत.

# क्रिडा महोत्सवाच्या माध्यमातून क्रीडा संस्कृती रुजवण्याचे काम होत आहे -नीरज राजगुरू

## शिवशारदा पब्लिक स्कूल येथे ॲथलेटिक्स स्पर्धाना प्रारंभ

गेवराई । प्रतिनिधी

शिवाजीराव पंडित कुटुंबीयांनी या भागामध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी खूप मोठ्या सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. आपण या सुविधांचा फायदा घेऊन क्रीडा क्षेत्रात करिअर करावे. खेळ आपल्याला शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सक्षम करतो. रणवीर पंडित यांनी आपल्या पदवीचा उपयोग फक्त पाटी लावण्यासाठी केला नाही तर या भागामध्ये क्रीडा क्षेत्रात भरीव काम करण्यासाठी केला आहे असे प्रतिपादन गेवराई विभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांनी केले. क्रीडा महोत्सवात ॲथलेटिक्स स्पर्धांचा शुभारंभ करताना ते बोलत होते.



जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात शिवाजीनगर गढी येथील शिवशारदा पब्लिक स्कूलच्या भव्य मैदानावर शुक्रवार दिनांक १० जानेवारी रोजी ॲथलेटिक्स स्पर्धांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी गेवराईचे विभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, जयभवानी भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, प्रा. गोगुले, शिव शारदा पब्लिक स्कूलचे प्रशासकीय अधिकारी अनंत डावकर, पोलीस कॉन्स्टेबल संपत तांदळे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रिडा ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनी आदिती दातखीळ हीने खेळाडूंना शपथ दिली. क्रीडा महोत्सवामध्ये क्रीडा संस्थेच्या शाळेचे १८ संघ सहभागी झाले आहे. चार गटात लांब उडी, धावणे, गोळा फेक आदी स्पर्धा

पान ३ वर

# आंबेडकरी विचारवंत एम. एस.घोक्षे गुरुजी कालवश

गेवराई । प्रतिनिधी

येथील सुप्रसिध्द आंबेडकरी विचारवंत आणि जुन्या चळवळीतील व्यासंगी शिक्षक श्री. एम. एस. घोक्षे गुरुजी यांचे वृद्धापकालाने निधन झाले. आंबेडकरी चळवळीतील व्यासंगी शिक्षक म्हणून सुपरिचित असलेले श्री. मल्हारराव शिवराम घोक्षे हे मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झालेले होते. श्री. एम. एस. घोक्षे गुरुजी म्हणून ते प्रसिद्ध होते तर सामाजिक - सांस्कृतिक चळवळीतही त्यांचे मोठे योगदान होते. उत्तम वाचक आणि परखड वक्ता असलेल्या गुरुजींनी विद्यार्थ्यांच्या असंख्य पिढ्या घडवून त्यांच्यात सामाजिक बांधिलकी रुजवली होती.



सुप्रसिद्ध लेखक- रंगकर्मी प्रा. बापू घोक्षे, प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. बाबासाहेब घोक्षे, मा. सभापती डॉ. बाळासाहेब घोक्षे, वैद्यकिय अधिकारी डॉ. विजयालक्ष्मी घोक्षे यांच्यासह सात मुलांचे श्री. एम. एस. घोक्षे गुरुजी हे वडील होते. तर प्रसिद्ध सिनेअभिनेत्री प्रिन्सेस डॉली घोक्षे यांचे ते आजोबा होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली,

पान ३ वर

# आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या बैठकीस उपस्थित राहा -सय्यद सलीमबापू

माजलगाव । प्रतिनिधी

आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसह इतर महत्त्वपूर्ण विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी औरंगाबाद येथे १४ जानेवारी नाम विस्तार दिनानिमित्त आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.या बैठकीस संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे की, येत्या १४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता मिलिंद कॉलेज परिसर(औरंगाबाद) संभाजीनगर येथे राज्य कार्यकारिणीची महत्त्वपुर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे, सदर बैठकीत भिम सैनिकांची समस्या,आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आंरिमोची भुमिका,रिपब्लिकन नेत्यांनी आंबेडकरी विचारधारे सोबत केलेली बेइमानी,आंरिमो का निष्क्रिय पदाधिकारी यांची हकालपट्टी इत्यादी विषयांवर बैठकिचे आयोजन केले आहे.त्याचप्रमाणे १४ जानेवारी मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार वर्धापन दिनानिमित्त भिम सैनिक दखल

पान ३ वर




# पसायदान सेवा प्रकल्पात रविवारी रंगणार राज्यातील प्रसिध्द गझलकारांची जुगलबंदी

## गुलाबी थंडीत उडणार हस्स्यांचे फवारे; कार्यक्रमाची प्रचंड उत्सुकता

बीड । प्रतिनिधी

वंचीत मुलांचे हक्काचे घर असलेल्या पसायदान सेवा प्रकल्पाचा १२ जानेवारी रोजी वर्धापण दिन आहे. तसेच राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती देखील आहे... दुधात साखर मिसळणार्या या सार्या औचित्याने राज्य नव्हे तर देशातील ख्यातनाम गझलकार स्मृतीशेष स्व. सतीष दराडे गझल मंचची स्थापना होत आहे. यावेळी राज्यातील ख्यातनाम गझलकारांचा गझल मुशायरा आणि युवा पुरस्कार सोहळ्याचे वितरण होणार आहे. गझल मुशायर्यात राज्यातील प्रसिध्द गझलकार सहभागी होत असून गुलाबी थंडीत वंचीत मुलांचे हक्काचे घर असलेल्या पसायदान सेवा प्रकल्पात गझलकारांची जुगलबंदी रंगणार आहे.. या कार्यक्रमाची गझलप्रेमींना प्रचंड उत्सुकता







आहे... रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता गझलप्रेमींनी उपस्थित रहावे, असे आवाहन, स्व. सतीष दराडे गझल मंच व पसायदान सेवा प्रकल्पाच्या वतीने करण्यात आले आहे.

तब्बल एका तपापुर्वी माँ. जिजाऊं व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधुन रंजना आणि गोवर्धन दराडे या

पान ३ वर

### यांचा होणार गौरव

सामाजिक कार्यकर्ते तथा स्वामी विवेकानंद गुरूकुलचे रोहीदास रोहीटे, संकल्प शैक्षणिक संकुल अंबाजोगाईचे कैलास भागवत चोले यांनी प्रतिकुल परिस्थितीवर मात करत तळागाळातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे... ही दोन्ही शैक्षणिक संकुले गुणवंत विद्यार्थी घडवणारी केंद्रे बनली आहेत... त्यांच्या या कार्याचा गौरव व्हावा म्हणून १२ जानेवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते पसायदान सेवा प्रकल्प येथे त्यांचा युवा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

### या गझलकारांची उपस्थिती

पसायदान प्रकल्प येथे गुलाबी थंडीत रविवार दि. १२ जानेवारी रोजी सायंकाळी महाराष्ट्रातील प्रसिध्द गझलकार संजय विटेकर, अश्विनीताई विटेकर, जयदीप विघ्ने, हर्षल पवार, संध्या शिंदे, दिवाकर जोशी, आकाश कंकाळ, गिरीश जोशी आदी गझलकार एकाहुन एक अशा गझला सादर करणार आहेत... गझल साहीत्यात देशभरात किलर नावाने प्रसिध्द असलेल्या सतीष दराडे यांच्या आठवणींना उजाळा देणार आहेत.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या बदनामीचे प्रकरण; कोर्टाने राहुल गांधींबाबत दिला ‘हा’ निकाल

पुणे: लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी आज स्वातंत्र्यवीर सावकर यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणात पुण्यातील विशेष न्यायालयात हजर राहिले. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ते न्यायालयात हजर राहिले. दरम्यान न्यायालयाने त्यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला. राहुल गांधी यांनी लंडनमध्ये अनिवासी भारतीयांसमोर केलेल्या भाषणात सावरकरांविषयी वादग्रस्त विधान केले होते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधींविरोधात न्यायालयात मानहानीचा दावा दाखल केला आहे. यादाव्यात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी राहुल गांधी यांच्या वतीने वकील अड. मिलिंद पवार यांनी अर्ज केला होता. विशेष न्यायालयाने हा अर्ज मंजूर केला असून, पुढील सुनावणी १८ फेब्रुवारी रोजी होणार आहे. खासदार-आमदारांविरोधातील दाव्यांची सुनावणी घेणाऱ्या विशेष न्यायाधीश अमोल शिंदे



यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. त्यात राहुल गांधी यांना हजर राहण्यासाठी १० जानेवारीची तारीख देण्यात आली होती. त्यानुसार, राहुल गांधी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयासमोर हजर झाले होते.

मानहानीच्या प्रकरणात राहुल गांधी पुणे न्यायालयात गैरहजर

वीर सारवकर यांच्याशी संबंधित वक्तव्याबाबत पुणे न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्याच्या सुनावणीसाठी काँग्रेस नेते राहुल गांधी हजर राहिले नाहीत. गांधींचे वकील मिलिंद पवार म्हणाले की, संसदेच्या हिवाळी अधिवेशनामुळे काँग्रेस खासदार राहुल गांधी हे हिंदुत्ववादी विचारवंत वीर सावरकर यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या मानहानीच्या तक्रारीप्रकरणी सोमवारी पुण्यातील न्यायालयात हजर झाले नाहीत.

काय आहे प्रकरण

वीर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी पुणे न्यायालयात तक्रार दाखल केली होती की, राहुल गांधी यांनी मार्च २०२३ मध्ये लंडनमधील भाषणात सांगितले होते की, सावरकरांनी एका पुस्तकात लिहिले होते की, त्यांना आणि त्यांच्या पाच-सहा मित्रांनी एकदा एका मुस्लिम माणसाला मारहाण केली होती आणि यानंतर सावरकर अत्यंत आनंदी होते.

याचिकेनुसार वीर सावरकरांनी असे कुठेही लिहिलेले नाही. त्यावेळी न्यायालयाने पोलिसांना या आरोपांची चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितले होते. चौकशीअंती विश्रामबाग पोलिसांनी तक्रारीत प्रथमदर्शनी सत्य असल्याचे सांगितले. सह दिवाणी न्यायाधीश आणि न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) अमोल शिंदे यांच्या खासदार-आमदार न्यायालयाने १८ नोव्हेंबर रोजी आदेश देताना राहुल गांधी यांना २ डिसेंबर रोजी न्यायालयात हजर राहण्यास सांगितले होते.लंडनमध्ये विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावकर यांच्याबद्दल एक वक्तव्य केले होते. त्या वक्तव्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध खटला दाखल करण्यात आला आहे. सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधींवर खटला दाखल करण्यातला कोर्टात धाव घेतली होती. लंडन येथे भारतीय लोकांसमोर सावरकरांचा अपमान केल्याचा आरोप राहुल गांधींवर आहे. याबाबतचा अहवाल पोलिसांनी पुणे कोर्टात दाखल केला आहे. सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी पुणे कोर्टात राहुल गांधी यांच्याविरुद्ध मानहानीचा खटला दाखल केला आहे. त्यानंतर कोर्टाने पोलिसांना तपास करण्याचे आदेश दिले होते.

# अपघात की घातपात? आईला परत येतो म्हणून सांगून गेला अन्

सांगली | प्रतिनिधी

येडेमच्छिंद्र (ता. वाळवा) येथील १८ वर्षीय विद्यार्थ्याचा राजस्थानच्या कोटा शहरात १ जानेवारीला अपघाताने मृत्यू झाला आहे. कुटुंबातील एकुलत्या मुलाच्या मृत्यूने खंडागळे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. बारावी परीक्षेच्या तोंडावरच त्याचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. केशवराज खंडागळे असे या विद्यार्थ्याचे नाव आहे.

येडेमच्छिंद्र (ता. वाळवा) सेवानिवृत्त मुख्याध्यापक गुणवंत खंडागळे यांचा केशवराज हा नातू होता. त्याला चांगले शिक्षण मिळावे, यासाठी आजोबांनी जीवापाड मेहनत घेतली. त्याच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करताना दहावीनंतर कोटा येथे कोचिंग क्लासमध्ये पाठविले. केशवराजची बहीण वैष्णवी कराडमध्ये शिकत आहे. शेतकरी वडील अमोल काही दिवस कोटा येथे



केशवराजसोबत, तर वैष्णवीसाठी काही दिवस गावात राहत होते. केशवराजची आई रूपा या मात्र मुलासोबत कोटा येथेच राहत होत्या.

३१ डिसेंबरला केशवराज लवकरच परत येतो, असे आईला सांगून घरातून बाहेर पडला. रात्री उशिरापर्यंत तो न परतल्याने आईने शोध सुरू केला. कोटा येथील ओळखीच्या मराठी माणसांची मदत घेतली पण तो सापडला नाही. त्यांनी कोटा पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली. ही बातमी कळताच वडील अमोल हेदेखील त्वरित कोटाकडे रवाना झाले. याचदरम्यान कोटापासून दिल्लीच्या दिशेने सुमारे ८० किलोमीटर अंतरावर रेल्वे रुळांवर केशवराजचा मृतदेह सापडला. त्याचा अपघाती मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगताचं खंडागळे कुटुंबाला धक्का बसला. केशवराजचा मृतदेह रुळांवर सापडल्याने हा अपघात आहे की घातपात, याविषयी कुटुंबियांच्या मनात सांशकता आहे. सखोल तपासानंतर कारण स्पष्ट होणार आहे.

# पालखी मार्ग बनलाय मृत्यूचा सापळा; एसटी बसने धडक दिल्याने दुचाकी स्वाराचा मृत्यू

सासवड | प्रतिनिधी

पुरंदर तालुक्यातील झेंडेवाडी सासवड पालखीमार्ग म्हणजे साक्षात मृत्यूचा सापळा झाला आहे. त्यातील झेंडेवाडी पासून पवारवाडी या परिसरातील महामार्गावर कित्येकांचा अपघातात मृत्यू झाला आहे. या मार्गावरील अपघातांची मालिका सतत सुरूच असून शुक्रवारी पुन्हा अपघातात एका व्यक्तीला आपला जीव गमवावा लागला आहे. एसटी बसची जोरदार धडक बसून विजय काळुराम कोंढाळकर (आबा) वय ६७ वर्षे रा जाधववाडी रोड जाधवगड ( दिवे ) यांचा मृत्यू झाला आहे. याबाबत पृथ्वीराज अशोक ढुम. रा ढुमेवाडी दिवे ता पुरंदर यांनी सासवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

सदर अपघातास जबाबदार असलेला एसटी बसचा चालक ज्ञानेश्वर तुळशीराम भांदुर्गे वय ३१, बारामती डेपो. मुळ रा योवता ता रिसोड जि वाशीम यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी सांगितले कि, शुक्रवार दि.१० रोजी मयत विजय कोंढाळकर त्यांच्या ताब्यातील टीव्हीएस कंपनीची एमएच १२ यु एल ९४३६ ही दुचाकी घेवुन ढुमेवाडीवरुन जाधव गड रोड येथे घराकडे निघाले होते. दरम्यान मयत विजय कोंढाळकर सकाळी ११.४५ दरम्यान रस्ता क्रॉस करीत होते त्याचवेळी त्याना बारामती आगाराची एसटीबस क्रमांक एमएच १४ के क्यु ५०४१ वरील चालक ज्ञानेश्वर तुळशीराम भांदुर्गे, बक्कल नं ८१०१५ याने भरधाव वेगाने येवून कोंढाळकर यांना जोरदार धडक दिली. मयत कोंढाळकर यांना जोरदार धडक बसल्याने डोक्यास गंभीर जखम होवून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. आणि त्यामध्येच त्यांचा मृत्यू झाला. याबाबत सासवडचे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास करण्यात येत आहे. दरम्यान विजय कोंढाळकर हे दिवे पंचक्रोशीतील प्रगतशील शेतकरी म्हणून परिचित होते. शेतात सतत विविध प्रयोग करून पिक उत्पादने घेत होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळाल व्यक्त करण्यात येत आहे.

## शिक्रापुरात दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू

शिक्रापूर (ता.शिरुर) येथील पुणे-नगर महामार्गावरुन रस्ता ओलांडणाऱ्या अज्ञात व्यक्तीला दुचाकीची धडक बसली. यामध्ये या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकीवर पाठीमागे बसलेला एकजण जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात हरीओम रणजीत गायकवाड याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# महाविकास आघाडीमध्ये बिघाडी! अमोल कोल्हेंनी मित्र पक्षांचे पिळले कान

पुणे | प्रतिनिधी

राज्यामध्ये विधानसभा निवडणूकीनंतर जोरदार राजकारण रंगले आहे. यंदाची निवडणूक ही प्रतिष्ठेची मानली जात होती. मात्र प्रत्यक्षात ही महायुतीच्या बाजूने पूर्णपणे एकतर्फी झाली. महायुतीला प्रचंड मताधिक्य मिळाल्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांचा दारुण पराभव झाला. अनेक मातब्बर राजकारणीं यंदाच्या निवडणुकीनंतर घरी बसले आहेत. यामुळे महाविकास आघाडीमध्ये नाराजी आणि असंतोष वाढू लागला आहे. यावरुन आता शरद पवार गटाचे नेते व खासदार अमोल कोल्हे यांनी टोला लगावला आहे.



खासदार अमोल कोल्हे यांनी राजकीय टिप्पणी केली आहे. त्यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये नवा उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तर महाविकास आघाडीच्या इतर पक्षांना टोला लगावला आहे. खासदार अमोल कोल्हे यांचा राज्यातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत महाविकास आघाडीतील मित्रपक्षांना सल्ला दिला आहे.

राजकीय बातम्या वाचण्यासाठी येथे वाचा

खासदार अमोल कोल्हे म्हणाले,विधानसभेतील पराभवामुळे काँग्रेसची मोडलेली पाठ अद्याप सरळ व्हायला तयार नाही तर दुसरीकडे शिवसेना अजूनही झोपेतून जागी झालेली नाही. राज्यात मित्र पक्षांच्या अशा वागण्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला विरोधी पक्ष म्हणून वाढण्यासाठी मोठा स्पेस आहे. तर पराभव हा आधी मनात होतो आणि त्यानंतर रणांगणांत होतो त्यामुळे मरगळ झटका आणि कामाला लागा. तुमच्याकडे लढणारे शरद पवार आहेत. लक्षात ठेवा बचेंगे तो और भी लढेंगे, असे खासदार अमोल कोल्हे म्हणाले आहेत.

मात्र खासदार अमोल कोल्हे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवताना मित्रपक्षांना मात्र खडेबोल सुनावले आहेत. त्यांच्या टीकेमुळे महाविकास आघाडीमध्ये सारे काही आलबेल नसल्याचे स्पष्ट झाले आहे. उद्धव ठाकरेंना त्यांच्या पक्षातील नेते आपण एकला चलो रेची भूमिका घ्यावी, अशी विनंती करत असल्याची माहिती मिळत आहे. तर विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत गेल्याने आपल्याला फटका बसलेला आहे, असे मत उद्धव ठाकरेंच्या पक्षाकडून देखील व्यक्त केले आहे.

महाराष्ट्रसंबंधित बातम्या वाचा एका क्लिकवर

गेल्या दोन दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाची संघटनात्मक बैठक वाय.बी . चव्हाण सेंटरमध्ये पार पडत आहे. शरद पवार , जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड यांच्यासह राष्ट्रवादीचे अनेक जेष्ठ व प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते या बैठकीस उपस्थित होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. विधानसभा निवडणूकीमध्ये मोठा पराभवाचा धक्का बसल्यामुळे सर्वच राजकीय पक्ष जोरदार कामाला लागले आहेत. पण खासदार अमोल कोल्हे यांच्या वक्तव्यामुळे महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांमध्ये वाद सुरु असल्याचे स्पष्ट होत आहे.

# पुण्यात चोरट्यांचा धुमाकूळ; कर्वेनगरमधील बंगला फोडून लाखोंचा ऐवज चोरला

पुणे | प्रतिनिधी

पुण्यातील कर्वेनगर परिसरातील बंगला फोडून चोरट्यांनी २ लाख ४० हजारांचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी चोरट्यांवर वारजे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत २६ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, कर्वेनगर येथील वेदांतनगरी परिसरात तक्रारदार यांच्या वडिलांचा बंगला आहे. तेथे वडीलांकडील कुटुंबीय राहतात. दुमजली बंगल्यात पाठिमागच्या बाजूने चोरटे आत शिरले. त्यांनी तक्रारदारांच्या वडिलांच्या व काकाच्या बेडरूममधील कपाटातून दोन लाख ४०



हजारांचा ऐवज चोरून पोबारा केला आहे. घटनेची माहिती मिळताच वारजे पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक संजय नरळे तपास करत आहेत.

यासोबतच नगर रस्त्यावरील कोलवडी गावात घरातून चोरट्यांनी ९० हजारांचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांवर लोणीकंद पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ३८ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. कोलवडी गावात तक्रारदारांचे घर आहे. ते शेतकरी आहेत. चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडले. कपाटातील दागिने आणि रोकड असा ९० हजारांचा ऐवज चोरुन चोरटे पसार झाले. सहायक निरीक्षक रवींद्र गोडसे तपास करत आहेत.

# हॉर्न वाजवल्याच्या रागातून पती-पत्नीला बेदम मारहाण; बाप लेकाला अटक

मुंढवा : हॉर्न वाजविल्याच्या कारणावरून एका कुटुंबाला फायटरने बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. पुण्यातील मुंढवा परिसरात हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या धक्कादायक घटनेत महिलेला देखील मारहाण करण्यात आली आहे. पोलिसांनी बाप-लेक शुभम गायकवाड व राजेंद्र गायकवाड यांना अटक केली आहे. याप्रकरणी ४७ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे.

गुरूवारी रात्री साडे नऊच्या सुमारास मुंढवा येथील सीएनजी पेट्रोल पंपाजवळ हा प्रकार घडला. तक्रारदार आणि त्यांच्या कुटुंबीय मुंढवा-कोरेगाव पार्क रोडवर दुचाकीवर प्रवास करत असताना, एक ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे



पती राजेश यांनी हॉर्न वाजवला. यावर गायकवाड बाप-लेकाने वाद घालण्यास सुरुवात केली. शुभम गायकवाडने गाडीतून उतरून तक्रारदारांना शिवीगाळ करत थेट फायटरने हल्ला केला. हल्ल्यात राजेश वाघचौरे, त्यांची पत्नी सुवर्णा व मुलगी संस्कृती जखमी झाले. मुंढवा पोलिस अधिक तपास करत आहेत.

# पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नायलॉन मांजाची होळी; विद्यार्थ्यांतर्फे जनजागृतीसाठी प्रबोधन फेरीचे आयोजन

पुणे | प्रतिनिधी

पतंग उंच उडावा यासाठी नायलॉन किंवा चायनीज सिंथेटिक मांजाचा वापर करू नये याबाबत जनजागृती करण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल टिळक रोड शाळेने परिसरात प्रबोधन फेरीचे आयोजन करून प्रतिकात्मक मांजाची सार्वजनिक होळी केली. मकर संक्रांत सण जवळ आला की नागरिक मोठ्या प्रमाणात पतंग उडवतात. हा पतंग उंच उडावा यासाठी नायलॉन मांजाचा वापर केला जातो.

पतंग काटाकाटीच्या स्पर्धेत कापलेला मांजा विजेचे खांब, इमारतींचे रेलिंग किंवा झाडांमध्ये अडकतो. परिणामी दरवर्षी तो नागरिकांसाठी अपघाताचे आणि हजारो पक्षांसाठी मृत्यूचे कारण ठरतो. त्यामुळे नायलॉन, प्लास्टिक, काच, धातूचा चुरा आणि विविध रसायने लावलेला धोकादायक मांजा





वापरू नये, असे आवाहन करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेना, स्काऊट गाईडच्या दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मुख्याध्यापिका सुनीता राव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक सुरेश वरगंटीवार, प्रवीण रांगोळे, हनुमंत तोडकर, विकास पढेर, पूनम पाटील यांनी संयोजन केले.

नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या दोघांना पकडले

पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. संक्रातीतील पतंगबाजीसाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजामुळे नागरिक तसेच पक्ष्यांना गंभीर दुखापत होण्याच्या घटना घडल्या आहेत. नायलॉन मांजा विक्रीवर बंदी असताना छुप्या पद्धतीने मांजा विक्री करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेने पकडले आहे. त्यांच्याकडून नायलॉन मांजाची रिळे जप्त करण्यात आली आहेत. बिबवेवाडी आणि धानोरी भागात ही कारवाई करण्यात आली आहे.

# डांगडिंग करणाऱ्या गुंड्या कसबेच्या गुंडांची वरात; येरवड्यात पोलिसांनी उतरवला माज

पुणे: पुण्यात गुन्हेगारी कारवाया करणाऱ्या गुंडांना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी काही दिवसांपूर्वीच कडक इशारा दिला होता. बेकायदेशीर धंदे करणाऱ्यांनी ताबडतोब शहर सोडण्याचा इशारा त्यांनी दिला होता. पण त्यांचा हा इशारा हवेतच विरला की काय, या गावगुंडांना पोलिसांचा धाक राहिलाय की नाही, असेही प्रश्न आता उपस्थित होऊ लागला होता. याचे कारण म्हणजे, मोक्का कारवाई अंतर्गत येरवडा जेलमध्ये असलेला प्रफुल्ल उर्फ गणेश कसबे.

मोक्का कारवाई अंतर्गत येरवडा तुरूंगात शिक्षा झालेला प्रफुल उर्फ गुड्या गणेश कसबे काल तब्बल साडे तीन वर्षांनी जेलमधून बाहेर आला. जेलमधून बाहेर येताच त्याने आपल्या ५०-६० समर्थकांसह येरवडा बाजार परिसरात मोठमोठ्या गाड्यांमधून



रॅली काढली. या रॅलीचा व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होऊ लागला. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या इशाऱ्यानंतर अवघ्या दोन-तीन दिवसांतच गुंडाच्या रॅलीचा असा व्हिडीओ व्हायरल होऊ लागल्याने या गुंडांना पोलिसांचा धाक राहिलाय की नाही, असा प्रश्न आता उपस्थित होत होता. पण आता या मिरवणुकीत डांगडिंग करणाऱ्या गुंडांची पोलिसांनी वरातच काढल्याची माहिती समोर आली आहे.

येरवड्यातील लक्ष्मीनगर परिसरात नुकत्याच झालेल्या एका रॅलीदरम्यान स्थानिक नागरिकांनी सांगितले की, या रॅलीमधील युवकांनी त्यांना धमकावले व ‘बाप बाहेर आलाय, बॉस बाहेर आलाय’ अशा शिवीगाळी केली. त्यानंतर नागरिकांनी लक्ष्मी नगर (शास्त्रीनगर) पोलीस चौकीमध्ये तक्रार दिली. पोलिसांनी तात्काळ संबंधित आरोपीला नोटीस दिली असून, तो फरार झाल्याची माहिती आहे. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला. पण त्याचवेळी रॅलीत दहशत माजवणाऱ्या आणि नागरिकांना शिवीगाळ करणाऱ्या त्याच्या इतर साथीदारांची पोलिसांनी धरपकड करत त्याच परिसरातून त्यांची वरात काढली. पोलिसांच्या या कारवाईमुळे येरवड्यात पोलिसांचे कौतुक होऊ लागले आहेत.

दरम्यान गेल्या आठवड्यातच अमितेश कुमार यांनी पुण्यातील गुंडांना सक्त ताकीद दिली होती. जर बेकायदेशीर धंदे केले, गँग चालवून खंडणी मागितली किंवा बळाचा वापर करून कोणाला जमीन खाली करण्यास भाग पाडले, तर आताच शहर सोडून द्या. अन्यथा, तुमच्या सात पिढ्यां विसरू शकणार नाही, अशी आम्ही कारवाई करू, असा इशारा अमितेश कुमार यांनी दिला होता.

येरवड्यात जुलै २०२१ मध्ये एक घटना घडली होती. येरवड्यातील लक्ष्मीनगर परिसरात सराईत गुन्हेगारांनी घरात घुसून तोडफोड केली आणि रस्त्यावर लावलेल्या वाहनांची नासधूस केली होती. यावेळी दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात आले होते. यावर येरवडा पोलिसांनी खूनाचा प्रयत्न, दहशत माजवणे आणि बेकायदेशीर हत्यारे बाळगण्या संदर्भात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात पोलिसांनी १४ आरोपींना अटक केली होती, त्यात तिघांना तडीपार केले होते.

गेल्या साडेतीन वर्षांपासून गुंड्या कसबे या आरोपीला येरवडा तुरुंगात ठेवले होते. नुकताच त्याला जामीन मंजूर झाला होता आणि त्याची सुटका झाली. सुटकेनंतर, कसबे आणि त्याच्या ५०-६० समर्थकांनी येरवडा बाजार परिसरातून एक रॅली काढली. रॅलीच्या दरम्यान, आरोप आहे की, त्याने आणि त्याच्या समर्थकांनी संपूर्ण परिसरात दहशत माजवली.

# पिंपरी सांडस येथील उसाच्या शेतात सापडले बिबट्याचे तीन बछडे



वाघोली : पिंपरी सांडस परिसरात ऊस तोड सुरु असताना बिबट्याचे तीन बछडे शेतात आढळून आले होते. मादी व बछड्यांची पुन्हा भेट घडवून आणण्यासाठी वनविभागाने बछडे सुरक्षित ठेवल्यानंतर मादी बिबट्या बछडे घेऊन गेली. त्यांच्या हालचाली टिपण्यासाठी कॅमेरे ही लावण्यात आले होते.

पिंपरी सांडस परिसरातील येथील शेतात ऊस तोड सुरू असताना कामगारांना हे बछडे आढळून आले. त्यांनी मालकाला सांगितले. यानंतर वन विभागाला कळविण्यात आले. अवघ्या चार पाच दिवसांच्या असणाऱ्या या बछड्यांना वन विभागाने सुरक्षित टोपलीत ठेवले.

नंतर त्यांच्या हालचाली टिपण्यासाठी कॅमेरे लावण्यात आले. मादी बिबट्याने रात्रीच्या वेळी तिन्ही बछड्यांना आपल्या बरोबर शेतात नेले. त्या कामगाराना मादी बिबट्याचे ही दर्शन झाले होते. वाघोली, मांजरी, पिंपरी सांडस, केसनंद, वाडेबोल्हाई आदी ठिकाणी बिबट्याचा वावर दिसून आला आहे. बिबट्याने मानवावर हल्ला केल्याच्या घटना समोर आल्या नसल्या तरी जनावरांना शिकार बिबट्याकडून केली जात आहे. यामुळे नागरिकांनी रात्रीच्या वेळी काळजी घ्यावी. एकटे बाहेर पडू नये. मुलांना एकटे सोडू नये. उसाच्या शेतात जाताना काळजी घ्यावी. असे आवाहन वन विभागाने केले आहे.